दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

www.epaper.rajyaloktantra.com

email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१६९ | गुरुवार, दि.१० ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

घटस्थापना

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

# मराठवाड्यातील २४ कोष उत्पादकांना 'रेशीम रत्न पुरस्कार'



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या वतीने मराठवाड्यातील २४ रेशीम कोष उत्पादकांना अमरावती येथे आयोजित कार्यक्रमात 'रेशीम रत्न' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील प्रत्येकी तीन रेशीम कोष उत्पादकांचा यामध्ये समावेश आहे.**

वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील, राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे, अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता महापात्रा, रेशीम संचालनालयाचे संचालक विनय मून, उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे, अमरावतीचे प्रादेशिक सहायक संचालक हेमंत लाडगाव, मराठवाड्याचे माजी उपसंचालक दिलीप हाके आदींच्या उपस्थितीत रेशीम रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले.

पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शहादेव किसनराव ढाकणे, सदाशिव गोपीनाथ गीते, गोरख एकनाथ बढे, जालना जिल्ह्यातील सोमेश्वर दिगंबर वैद्य, जगन दौलत मुळे, भाऊसाहेब विठोबा वाघ, नांदेड जिल्ह्यातील ३विनोद रमेश पेंटे, गंगाधर माधव कदम, गजानन माधव कदम, लातूर जिल्ह्यातील शत्रुघ्न तुकाराम फड, सिद्धेश्वर भगवान कागले, सुनील मुरलीधर वडसकर, धाराशिव जिल्ह्यातील शिवलिंग बाबूराव सोनटक्के, महाबळेश्वर रामचंद्र डुकरे, अर्जुन रामचंद्र उमाप, बीड जिल्ह्यातील सर्जेराव नरहरी चव्हाण, पार्वती वैजनाथ भरडे, शिवाजी धर्मराज फाटे या रेशीम ◀◀ पान २ वर

## सत्यभामा बांगर अटकेत, १३ कोटीच्या अपहाराचा ठपका

### रामकृष्ण बांगरसह ४१ जणांवर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

**जिल्हा विशेष लेखा परिक्षक यांनी केलेल्या लेखापरिक्षणात रामकृष्ण बांगर हे महात्मा फुले अर्बन बँक लिमीटेडचे संस्थापक अध्यक्ष असून त्यांची पत्नी सत्यभामा बांगर या पाटोदा तालुका दुध संघाच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन आहेत. त्यांनी चेअरमन, संचालक, पदाधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन १३ कोटी २१ लाख ६० हजार २५ रुपयांचा अपहार व गैरव्यवहार केलेला आहे. तसेच १४ संस्थेचे कोणतेही कागदपत्र न घेता, मागणी अर्ज न घेता, कोणतेही तारण न घेता बनावट कागदपत्र तयार करुन ते खरे असल्याचे भासवत त्यांच्या नावे कर्ज दाखवून ही रक्कम स्वत: उचलून गैरव्यवहार केलेला आहे. या प्रकरणी ४१ जणांवर पाटोदा पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल असून यामध्ये सत्यभामा बांगर यांना अटक केली असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली.**

जिल्हा विशेष लेखा परिक्षक बाळासाहेब उत्तमराव भोसले यांच्या फिर्यादीवरुन रामकृष्ण मारोती बांगर, सत्यभामा रामकृष्ण बांगर यांच्यासह संदिप जगन्नाथ सानप, बाळू मच्छिंद्र पवार, भाऊसाहेब बाळासाहेब सोनसळे, तुकाराम रामा बावणे, कार्यारंभ भगवान बाबासाहेब शिंदे, श्रीरंग उत्तमराव सानप, श्रावण श्रीरंग बांगर, संजय ◀◀ पान २ वर

# भाजपने हरियाणातील निकालावर जाऊ नये !

## जरांगे पाटील यांचा इशारा

जालना । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातून आम्ही पण भाजपला १०६ आमदार दिले होते, इकडचा प्रश्न वेगळा तिकडचा प्रश्न वेगळा आहे, इथे एकटा मराठा ५० ते ५५ टक्के आहे. इथे एका मतदारसंघात लाख–लाख मतदान आहे, असे म्हणत हरियाणातील निकालावर भाजपने जाऊ नये, असा इशाराच मनोज जरांगे पाटील यांनी भाजपला दिला आहे.**

देशातील दोन राज्यात झालेल्या निवडणुकांच्या निकालात भाजपला चांगले यश मिळाले असून हरियाणामध्ये तिसऱ्यांदा सत्ता काबिज करण्यात भाजपला यश आले आहे. त्यामुळे, भाजप नेत्यांचा विश्वास वाढला असून हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्रातही महायुती व भाजपला मोठे यश मिळेल, असे भाजप नेते सांगत आहेत. याशिवाय हरियाणामध्ये जाट समाजाविरुद्ध ओबीसी मतदान एकटवल्यामुळे भाजपचा तिथे विजय झाल्याचे मत नोंदविण्यात येत असल्यासंदर्भात मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना पाटील म्हणाले, कधी हिंदुत्व म्हणतात, कधी



ओबीसी म्हणतात यांचे यांनाच कळत नाही. हरियाणा आणि महाराष्ट्रात तिकडे आणि इकडे फरक आहे, हरियाणात एखादा मराठा, एखादा जाट किंवा एखाद्या शेतकऱ्याने मतदान केलेच असेल ना, मतदान होऊन गेले की हे असे बोलतात, असे म्हणत मनोज जरांगे यांनी हरियाणा व महाराष्ट्रातील राजकारण वेगळे असल्याचे म्हटले. निवडून येताना आणणारा एक आणि नाव एकाचे घ्यायचे ही यांची सिस्टमच आहे, हे एकदम खालच्या थराला जात आहेत. जो मोठे करतो त्यांच्याच नावाने हे खडे फोडत आहेत. यांना हिंदुत्वाने निवडून आणले की ओबीसींनी निवडून आणले की यांना बहुजनांनी निवडून आणले काही ताळमेळ नाही. ज्यांनी निवडून आणले, त्यांच्याविरुद्धच नाव हे सांगत आहेत, ◀◀ पान २ वर

### आचारसंहिता लावा, मग सांगतो

मराठ्यांच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी केल्यास तुमचे शंभर टक्के सरकार येईल, इथे मराठ्यांच्या नादी लागून मराठ्यांच्या आयुष्याचे, समुदायाच्या भविष्याचे रक्त प्यायचे इथे चालबाजी चालणार नाही. मराठ्यांचा तुम्ही अवमान आणि अपमान करून त्यांच्या डोळ्यात धूळ फेकली आहे. यांनी आमची खुन्नस धरली आहे, आमच्या उरावर बसून त्यांनी दुसऱ्याला आरक्षण दिले आहे आणि आम्हाला दिले नाही. त्यामुळे, आमचा प्रश्न न सोडता आचारसंहिता लावा मग मी तुम्हाला सांगतो, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे.

## पाच वर्षात जमलं नाही ते विजयसिंहांनी महिनाभरात करुन दाखविले

### गेवराई तालुक्यातील १२०६० निराधारांचे अर्ज मंजूर

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील निराधारांच्या प्रश्नांवर सातत्याने राजकीय पोळी भाजण्याचे काम आजवर सत्ताधार्यांकडुन होत होते. राज्यातील सत्तांतरानंतर विजयसिंह पंडित यांनी राजकीय प्रतिष्ठापणाला लावुन संजय गांधी निराधार अनुदान समितीचे गठण केले. दादासाहेब घोडके यांच्या अध्यतेखालील समिती कार्यरत होताच त्यांनी अतिशय तत्परतेने निराधारांची प्रकरणे हाताळली. प्रशासकीय यंत्रणेला समिती सदस्यांनी अक्षरश: खांद्याला खांदा देवुन दिवसरात्र एक करत गेवराई तालुक्यातील प्राप्त झालेल्या १५६३० एकुण अर्जांची बारकाईने तपासणी करुन १२०६० अर्ज मंजुर करत खर्या अर्थाने निराधारांना न्याय देण्याचे काम केले. विरोधकांना सत्तेत असतांनाही पाच वर्षात जे जमलं नाही ते विजयसिंह पंडित यांनी महिण्याभरात करुन दाखविल्याची चर्चा गेवराई तालुक्यात आहे.



गेवराई तालुक्यातील निराधारांचा प्रश्न सातत्याने ऐरणीवर आला की, त्यावर राजकीय ◀◀ पान २ वर

## राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचा बीड जिल्ह्यात विविध घटकांशी संवाद

बीड । प्रतिनिधी

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज बीड जिल्हा दौऱ्यात शासकीय विश्रामगृह येथे लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याशी जिल्ह्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. तसेच उद्योग, संस्कृती, पर्यटन, साहित्य, माध्यम, उद्योजक तसेच विविध समाज घटकांशी



संवाद साधून त्यांच्या जिल्ह्यांच्या विकासाबाबत असलेल्या अपेक्षा, अडचणी व संकल्पना जाणून घेतल्या.

यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार ॲड. उषा दराडे यांच्यासह विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,प्रशिक्षाणार्थी सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांच्यासह विविध विभागाचे प्रशासकीय प्रमुख उपस्थित होते. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या समोर मान्यवर व्यक्तींनी शेतकरी ◀◀ पान २ वर

### माळ आठवी



अष्टमीचे दिवशी
अष्टभुजा नारायणी हो ।
संह्याद्री पर्वती उभी
पाहिली जगत्जननी हो
मन माझे मोहिले शरण
आलो तुज लागुनी हो ।
स्तनपान देऊनी सुखी केले
अंत:करणी हो ।। ८ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

## गरिबांना २०२८ पर्यंत मिळणार मोफत तांदूळ

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्रीय मंत्रिमंडळाने १७ हजार ८२ कोटी रुपयांच्या पोषक तांदूळ योजनेला मंजुरी दिली आहे. यामध्ये पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना यासह संबंधित सर्व योजनांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे गरिबांना २०२८ पर्यंत मोफत पोष्टिक तांदूळ मिळणार आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.९) झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये गरिबांना पोषक आहार, गुजरातमधील लोथल येथे राष्ट्रीय सागरी वारसा संकुल आणि राजस्थान-पंजाब या सीमावर्ती राज्यांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे या निर्णयांचा समावेश आहे. जुलै २०२४ पासून सुरू होणारी ◀◀ पान २ वर

## २५० सोलर हायमास्टने बीड शहर उजळणार


### डीपीसीतून ६ कोटींचा निधी; ना.धनंजय मुंडे यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार

बीड । प्रतिनिधी

शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात येणार असल्याने शहर उजळणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून निधी मिळाला असून पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे भरीव निधी दिल्याबद्दल आभार मानले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून बीड विधानसभा





मतदारसंघातील शहर व ग्रामीण भागासाठी कोट्यवधींचा निधी मिळाला आहे. त्यातील अनेक विकासकामे प्रगतीपथावर आहेत. अलिकडे शहरातील अनेक भागात पथदिवे बंद असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. हे पथदिवे सुरू करून ◀◀ पान २ वर

## राज्य सरकारकडून १५ जातींचा ओबीसीत समावेश करण्याची केंद्राकडे शिफारस

मुंबई । प्रतिनिधी

**आता विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकींचा धडाका लावला असून, महत्त्वाचे निर्णय घेतले जात आहेत. महाराष्ट्रातील १५ जातींची ओबीसींमध्ये समावेश करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे.**

राज्यात गेल्या दीड वर्षांपासून मराठा आरक्षणाचा लढा तीव्र बनला असून दुसरीकडे धनगर समाजही एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करत आक्रमक झाला आहे. त्यामुळे, राज्य सरकारकडे राज्यातील आरक्षणाच्या मुद्द्यावर तोडगा कसा काढायचा हा प्रश्न आहे. मराठा समाजाला राज्य सरकारने १० टक्के आरक्षण लागू केले आहे. मात्र, आम्हाला ओबीसीतूनच आरक्षण हवे असल्याचे राठा समाज बांधवाचे म्हणणे आहे. त्यासाठी, मनोज जरांगे ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | २,६३६ | ३,२५० | २,९७८ |
| ज्वारी/हायब्रिड :६४.०० क्विंटल | २,०५० | २,४०१ | २,२१० |
| मूग : २.५० क्विंटल | ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ३३.५० क्विंटल | ६,५०१ | ७,६०० | ७,०६७ |
| बाजरी : ८.०० क्विंटल | २,२६४ | २,६६१ | २,४६१ |
| मुग : ११.०० क्विंटल | ६,७०० | ७,३०० | ६,९६३ |
| सोयाबीन: ६६८.०० क्विंटल | ३,९०१ | ४,३२० | ३,८०१ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

## पालकमंत्री धनंजय मुंडेंचे बीड जिल्हावासीयांना मोठे गिफ्ट

### यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यात तब्बल २८ हजार घरकुलांना शासनाची मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा वासीयांना ऐन सणासुदीच्या काळात मोठे गिफ्ट दिले असून, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून जिल्ह्यासाठी तब्बल २८ हजार घरकुले मंजूर करण्यात आली आहेत.**





याबाबतचे शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये एका शासन निर्णयाद्वारे १७०८१ तर दुसऱ्या शासन निर्णयाद्वारे ९९४१ अशा एकूण २८ हजार घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री श्री अतुल सावे यांचे याबद्दल आभार मानले आहेत.विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गरजू नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतुन स्वत:चे पक्के घर बांधण्यासाठी ◀◀ पान २ वर



## अग्रलेख

# असा अतिआत्मविश्वास महाराष्ट्रात दाखवू नये !

जम्मू - काश्मिर व हरियाणा विधानसभा निवडणुकीचा एनडीए व इंडिया आघाडीतील सामना बरोबरीत सुटल्याचे दिसून येते. किंबहुना, एकूण हरियाणा विधानसभेतील काट्याची टक्कर बघता भाजपाने मारलेली मुसंडी उल्लेखनीय म्हटली पाहिजे. हरियाणामध्ये मागच्या दहा वर्षांपासून भाजपाचे सरकार सत्तेवर असल्याने सरकारबद्दल काहीशी नाराजी स्पष्टपणे जाणवत होती. त्याचबरोबर बव्हंशी शेतकरी वर्गाच्या मनातही सरकारबद्दल असंतोष होता. या पार्श्वभूमीवर भाजपाने डॅमेज कंट्रोलवर दिलेला भर निर्णायक ठरल्याचे दिसून येते. उत्तराखंडमध्ये २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपाने सहा महिने आधी नेतृत्व बदल करण्याचा निर्णय घेतला व विरोधात जाऊ पाहणारे जनमत पुन्हा स्वत:कडे वळविले. या निवडणुकीत भाजपाला ७० पैकी ४० जागा मिळाल्या. तोच पॅटर्न हरियाणामध्ये वापरला गेला. मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार करून त्यांच्या जागी नायबसिंह सैनी यांची नियुक्ती करण्यात आली. पक्षाकरिता हा टर्निंग पॉईंट ठरला, असे म्हटल्यास ते चुकीचे ठरू नये. हरियाणात साधारण २० जागांवर ओबीसींचा प्रभाव आहे. सैनी यांचा चेहरा पुढे करून भाजपाने ओबीसी मतांची बेगमी केली. काँग्रेसने मात्र ओबीसी मतपेढीकडे फारसे लक्ष दिले नाही. याशिवाय काँग्रेस व आपमधील दुभंगही भाजपाला साह्याभूत ठरला, असे निकालावरून स्पष्टपणे अधोरेखित होते.

इंडिया आघाडीमध्ये काँग्रेस व आप हे दोन्ही पक्ष एकत्र आहेत. हरियाणातही एकत्रित निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने दोन्ही पक्षांकडून पावले उचलली जात होती. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही हरियाणामध्ये काँग्रेस व आपने एकत्र लढावे, अशा सूचना स्थानिक नेत्यांना केल्या होत्या. परंतु, सत्तारूपी लोण्याच्या गोळ्यावरून दोन्ही पक्षांमध्ये वाद झाला व या दोघांच्या भांडणाचा थेट लाभ भाजपाला झाला. त्यात ऐन निवडणुकीच्या वेळी केजरीवाल यांची झालेली मुक्तताही पथ्यावर पडली, असे म्हणण्यास वाव आहे. काँग्रेसबद्दल काय बोलावे? थोडे यश मिळाले, की काँग्रेसवाले लगेच हवेत जातात. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला मिळालेल्या यशानंतर अगदी हरियाणापासून महाराष्ट्रापर्यंतच्या काँग्रेसच्या बहुतांश नेत्यांच्या डोक्यात हवा गेली आहे. कुठे एखाद दुसऱ्या निवडणुकीत विजय झाला, की यांना विश्व जिंकल्यासारखे होते. हरियाणात तेच झाले. काँग्रेसचा चेहरा असलेले भूपेंद्रसिंग हुडा आणि कुमारी सेलजा यांच्यातील अंतर्गत संघर्ष पक्षाकरिता मारका ठरला. या दोघांमधील शह काटशहावरून राहुल गांधी यांनी त्यांना कानपिचक्याही दिल्या होत्या. त्याचबरोबर गाफील राहू नका, आपली सत्ता आली असे समजू नका, असा इशाराही दिला होता. परंतु, स्थानिक नेत्यांनी काहीही बोध घेतला नाही. त्यामुळे या पराभवाला प्रामुख्याने येथील स्थानिक नेतृत्वातील यादवीस जबाबदार धरावे लागेल. हरियाणात एकूण ९० जागा असून, ४८ जागा मिळवून भाजपाने बहुमताचा ४६ हा आकडा पार केल्याचे दिसते. तर काँग्रेसला ३७ जागा मिळाल्याचे पहायला मिळते. हे बघता सक्षम विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस पक्षही पुढे आला आहे. आता हा निकाल स्वीकारून काँग्रेसवाल्यांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर असा अतिआत्मविश्वास महाराष्ट्रात दाखवू नये, हा या निकालाचा अन्वयार्थ आहे.

३७० कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीर राज्यात प्रथमच निवडणूक झाली. या निवडणूक निकालाबाबत संबंध देशभरात उत्सुकता होती. प्रत्यक्ष निकालात नॅशनल काँग्रेस व काँग्रेस युतीने ४९ जागांचा आकडा गाठत बहुमत प्राप्त केले. तर भाजपानेही २९ जागांवर विजय मिळविला. या निवडणुकीत पीडीपीने धर्मनिरपेक्ष पक्षाला पाठिंबा देण्याचे आधीच जाहीर केले होते. त्यांना ३ जागांवर समाधान मानावे लागले आहे. तथापि, एकूणच निकाल बघता नॅशनल कॉन्फरन्सला मिळालेले यश नजरेत भरणारे म्हणता येईल. या पक्षाने ४० चा आकडा पार करीत आपला प्रभाव दाखवून दिला आहे. याचे श्रेय पक्षाचे अध्यक्ष फारूक अब्दुल्ला व मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असलेल्या उमर अब्दुल्ला यांना द्यावे लागेल. या राज्यामध्येही जागावाटपावरून नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेसमध्ये काहीसे मतभेद होते. पण, ते तुटेपर्यंत ताणले जाणार नाहीत, याची दक्षता घेण्यात आली. त्याचे फळ त्यांना मिळाले. आता उमर यांचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झाला आहे. परंतु, सध्याची येथील स्थिती बघता त्यांच्यासाठी राज्याचे नेतृत्व करणे आव्हानात्मक असेल. मागच्या काही दिवसांत नंदनवनातील वातावरण बिघडले आहे. दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत. अशांत काश्मीरमध्ये पुन्हा शांतता प्रस्थापित करण्याचे आव्हान नव्या सरकारपुढे असेल. या दोन्ही पक्षांमध्येही अंतर्विरोधाचेही काही मुद्दे आहेत. जम्मू-काश्मीर हा केंद्रशासित प्रदेश असून, त्याला राज्याचा दर्जा नाही. या पार्श्वभूमीवर जम्मू काश्मीरला संपूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा मुद्दा निवडणुकीत प्रकर्षाने उपस्थित करण्यात आला होता. आता पुढच्या भूमिकेबाबत औत्सुक्य राहील. तर ३७० वरूनही नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेसमध्ये मतमतांतरे दिसतात. हे बघता त्यांना किमान समान कार्यक्रम निश्चित करून सरकार चालवावे लागेल. आता या दोन राज्यांतील निवडणुकीनंतर महाराष्ट्र व झारखंडमध्ये काय होणार, याकडे राज्याचे लक्ष असेल. कोणतीही निवडणूक प्राणपणाने लढायची, हा भाजपाचा विशेष आहे. अमित शहा यांच्याकडे निवडणूक फिरविण्याची कला आहे. त्यांनी वेळावेळी आपले हे कौशल्य दाखवून दिले आहे. महाराष्ट्र भाजपासाठी किती महत्त्वाचे आहे, हे मागच्या अडीच वर्षांत देशाने पाहिले. त्यामुळे ही निवडणूक जिंकण्यासाठी भाजप आकाश पाताळ एक करणार, हे नक्की. लाडकी बहीणसारखी लोकप्रिय योजना आणून राज्य सरकारबद्दलची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याशिवाय अनेक सवलती व योजनांचा मागच्या काही दिवसांपासून वर्षाव सुरू आहे. अशा स्थितीत हुरळलेल्या काँग्रेसने ठाकरे सेनेविरोधात दबावाचे राजकारण केले, तर महाराष्ट्रातही या पक्षाचा आत्मघात होईल, अशी परिस्थिती दिसत आहे.

# यापुढेही शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही-आ.लोणीकर

**परतुर । प्रतिनिधी**

**परतुर शहरातील विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही यापूर्वी परतुर शहरात ५०० कोटी रुपयांची विकास कामे मंजूर करून अनेक कामे पूर्ण झाली असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते परतुर येथील पारडगाव गल्ली मध्ये मार्केट यार्ड ते पारडगाव गल्ली २ कोटी ५० लाख रुपये किमतीच्या सिमेंट रस्त्याच्या लोकार्पण प्रसंगी बोलत होते.**



आपण मंत्री झाल्यानंतर परतूर शहराच्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना दिली असून गणपती मार्ग मुख्य रस्ता स्मशानभूमी विकास नाट्यगृह कोर्ट इमारत वस्तीग्रह रेल्वे लाईन उड्डाणपूल आदी कामांसाठी साडेतीनशे कोटीच्या वर निधी उपलब्ध करून दिला होता चालू पंचवार्षिक मध्ये आपण परतूर शहरात आमदार असताना गेल्या अडीच वर्षात दोनशे कोटी रुपयांचे विकास कामे केली असून प्रत्येक गल्लीबोळामध्ये रस्ता बांधकाम आपण केलेले असून मुस्लिम वस्तीमध्ये एक कोटी रुपयांचा निधी आपण उपलब्ध करून दिला असून ते त्या चार दिवसात त्या भागातील रस्त्यांची कामे सुरू होतील असेही यावेळी बोलताना ते म्हणाले परतूर शहरात १९०० घरकुले मंजूर करून खऱ्या अर्थाने घरकुलाचा लाभ परतूर शहरातील सर्वसामान्य गोरगरीब दिन दुबळ्या जनतेला मिळून दिला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले पुढे बोलताना ते म्हणाले की, माझ्या राजकीय कारकीर्दीमध्ये मी जात धर्म पंथ यापलीकडे जाऊन काम करत असताना परतूर शहरासह मतदारसंघामध्ये अनेक विकासाच्या योजना सर्वसामान्य जनतेला दिल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना रूर्बन यासारख्या महत्त्वकांक्षी योजना आखत सर्वसामान्यांना बळ देण्याचे काम खऱ्या अर्थाने आपण केले असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. शहराची बकाल झालेली अवस्था बदलून काढण्यासाठी सर्वप्रथम आपण परतुर शहरातील रस्त्यांना प्राधान्य दिले त्या माध्यमातून शहरात आज रस्त्याचे जाळी उभे राहिले असून शहरातील सुबक आणि पक्के रस्ते ही याची ग्वाही देतात असे यावेळी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले.

# जि.प.शाळांच्या भौतिक व शैक्षणिक सुविधासाठी दोन कोटी ६८ लाख ४७ हजार रुपयाच्या निधीचे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या २३५८ शाळेसाठी दोन कोटी ५५ लक्ष २७ हजार पाचशे रुपये तर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक ५४ शाळेसाठी १३ लाख २० हजार रुपयाचा निधी शाळा अनुदान उपक्रमासाठी वितरित करण्यात आला आहे. शाळेच्या भौतिक आणि शैक्षणिक सुविधेसाठी शासनाच्या नियमानुसार सदर शाळा अनुदानाचा वापर करण्यात यावा, शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शाळा अनुदानातून खर्च करण्यात यावा, असे आदेश बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत.**

समग्र शिक्षा जिल्हा परिषद बीड अंतर्गत सन २०२४- २५ या वर्षासाठी प्राथमिक २३९८ शाळेसाठी ५० टक्के निधी शासनाकडुन प्राप्त झाला आहे. १ ते ३० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेला ५००० रुपये, ३१ ते १०० विद्यार्थी असलेल्या शाळेला १२,५०० रुपये, १०१ ते २५० विद्यार्थ्यांसाठी २५००० रुपये, २५१ ते १००० विद्यार्थ्यांसाठी ३७ हजार ५००, आणि १००० पेक्षा जास्त पट असलेल्या शाळेसाठी ५०,००० रुपयाचा निधी मान्य करण्यात आला आहे. सदर अनुदानातून शाळेतील भौतिक व शैक्षणिक तरतुदीसाठी निधी देण्यात आला आहे. या अनुदानातून शाळेची गरज लक्षात घेऊन शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने खर्च करण्यात येणार आहे. या निधीतून खेळाचे साहित्य, क्रीडा साहित्य, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी, शाळेचे वीज बिल, इंटरनेट, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच शैक्षणिक साहित्य निर्मिती व अध्ययन-अध्यापनासाठी साहित्याचा समावेश आहे. या अनुदानातून शाळा इमारत शौचालयाची दुरुस्ती, भौतिक सुविधा करण्यासाठी अनुदान वापर करण्यात येणार आहे. हात धुण्यासाठी द्रव्य स्वरूपातील वस्तू ही खरेदी करता येणार आहेत. शाळेचे स्वच्छता व परिसरातील निर्जंतीकरण आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्यांच्या दृष्टीने अनुकूल राहील. संयुक्त शाळा प्राथमिक अनुदान तालुका न्याय पुढील प्रमाणे आहे. अंबाजोगाई १८ लक्ष ६५ हजार, आष्टी २७ लक्ष २५ हजार, बीड ४० लक्ष १००००, धारूर ३९,१२,५०० , गेवराई ३९,१२,५००, केज- २४,८०,०००, परळी १९,८७,५००, पाटोदा- १५,१२,५००, शिरूर- १४७२,५००, वडवणी- ११,१५,०००, आणि बीड शहर साधन केंद्र- ३,७०,५०० या प्रमाणे निधी दोन कोटी ५५ लक्ष २७ हजार ५०० मान्य करण्यात आला आहे. शासनाच्या विहित नियमावलीनुसार सदर खर्च संयुक्त शाळा अनुदानासाठी वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या ५४ माध्यमिक शाळांसाठी १३ कोटी २०,००० रुपयाचा निधी मान्य करण्यात आला आहे. सदर निधी शाळा व्यवस्थापन विकास समितीच्या मान्यतेने खर्च करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. शाळेच्या अत्यावश्यक गरजा लक्षात घेऊन सदर खर्च करणे अपेक्षित आहे. स्वच्छतागृहाच्या सुविधेसाठी व देखभालीसाठीही सदर अनुदानातून खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. शाळा अनुदान उपक्रमांतर्गत निधीचा विनियोग देखभालदुरुस्ती, शौचालय वापर साहित्य व इतर भौतिक सुविधासाठी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ.श्रीहरी लहाने यांना श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्व, सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ, विठाई हॉस्पिटलचे संचालक तथा श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक सचिव डॉ. श्रीहरी लिंबाजीराव लहाने यांचे दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी दु:खद निधन झाले. स्व. डॉ. श्रीहरी लहाने यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी गुरुवार दि.१० ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ४.३० वाजता श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान, बीड येथे संत भगवानबाबा प्रतिष्ठान विश्वस्त, भगवानबाबा सप्ताह समिती व डॉ. श्रीहरी लहाने मित्र परिवाराचे वतीने श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# बीड जिल्ह्यातील १५ प्रमुख रस्त्यांची राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नती, रस्ते होणार चकाचक

## पालकमंत्री धनंजय मुंडेंचा यशस्वी पाठपुरावा; शासन निर्णय निर्गमित

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या परळी वैद्यनाथ सह अंबाजोगाई, केज, धारूर, माजलगाव, वडवणी, बीड पाटोदा व शिरूर कासार या तालुक्यातील १५ प्रमुख रस्त्यांना त्यांची दर्जा उन्नती करून राज्य मार्गाचा दर्जा देण्यात येत असल्याचा शासन निर्णय आज सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केला असून, जिल्ह्यातील शेकडो किलोमीटर चे १५ प्रमुख रस्ते चकाचक होणार आहेत. यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचा पाठपुरावा यशस्वी ठरला आहे.**

धनंजय मुंडे यांच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंतांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील इतर जिल्हा मार्ग, ग्रामीण मार्ग तसेच प्रमुख जिल्हा मार्ग अशा १५ रस्त्यांची राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नती करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात आला होता, त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने मंजुरी दिली असून, याबाबतचे दोन शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आले आहेत. पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे यासाठी आभार मानले आहेत. परळी तालुक्यातील मालेवाडी हाळम ते नागदरा ते राज्य मार्ग ५४८ (लांबी २३ किमी), राज्यमार्ग ५४८ ते जोडवाडी धसवाडी उजनी भतानवाडी, बाभळगाव भवानवाडी पट्टीवडगाव पिंपरी चंदनवाडी तांदुळवाडी लिमगाव (लांबी २९ किमी), दैठणा घाट हाळम दौंडवाडी घाटनांदुर चोथेवाडी, लिंबगाव बर्दापूर लांबी (४३ किमी), मुरंबी नवाबवाडी घाटनांदुर ते राज्य मार्ग ५४८ (लांबी १० किमी), जिजिमा ९३ सायगाव भारत जवळगाव गिरवली बावणे ते राज्य मार्ग ५४८ ब (लांबी २५ किमी), नथरा इंजेगाव राज्य मार्ग ५४८ ब देशमुख टाकळी पांगरी नागापूर साकुड अंबाजोगाई ते राज्य मार्ग २३५ (लांबी ३३ किमी) त्याचबरोबर राज्य मार्ग ३६१ टोकवाडी नागापूर मांडेखेल नागपिंपरी, बोधेगाव कावळेवाडी म्हातारगाव कान्नापूर हिंगणी कासारी बोडका कारीमार्गे उपळी (लांबी ५० किमी), प्रतिमा बावन बोधेगाव राक्षस वाडी चिचखंडी भावठाणा धावडी डोंगरपिंपळा सनई मोरेवाडी राज्यमार्ग ५६ ते अंबाजोगाई गीता जवळगाव लिमगाव हातोला ते प्रतिमा ५७ (लांबी ४८ किमी), प्रतिमा १८ ते धनेगाव नायगाव सौंदना इस्थळ आपेगाव धानोरा देवळा राज्य मार्ग २११ ते धानोरा बुद्रुक मुडेगाव नांदगाव बर्दापूर तळेगाव निरपणा उजनी ते राज्य मार्ग ५४८ ड (लांबी ६८ किमी), राज्य मार्ग ६१ ते खरात आडगाव टाकळी आनंदगाव राज्य मार्ग ३६१ दिंद्रुड आडस होळ बोरी सावरगाव ते बनसारोळा इस्थळ ते बीड जिल्हा हद्द (लांबी ७० किमी), राज्यमार्ग ५५ ते परडी माटेगाव चिंचाळा कुप्पा राज्यमार्ग ३६१ ते उपळी गावंदरा काटेवाडी भोगलवाडी पिंपळवाडी असोला आवरगाव ते राज्य मार्ग २३२ (लांबी ३८ किमी), देवगाव विडा सिंधी फाटा येवता कोळवाडी तरनळी ते राज्य मार्ग ५४८ सी धारूर असोला अंजनडोह ते मुरळी राज्यमार्ग २११ (लांबी ४५ किमी), डोंगर किनी ते वंजारवाडी रायमोहा खालापुरी साक्षाळ पिंपरी शिरस मार्ग कामखेडा माळापुरी कुर्ला कुक्कडगाव नाथापूर रंजेगाव ते पिंपरखेडा वडवणी चिखल बीड जिवाचीवाडी लहरी कानडी माळी सोनेगावला आनंदगाव ते पैठण राज्य मार्ग रस्ता ६४ (लांबी १४५ किमी), राज्य मार्ग २२२ ते दहिफळ वडमावली देवगाव शिरूर घाट पट्टी घाट ते प्रतिमा ४० बीड जिल्हा हद्द (लांबी ४० किमी) आणि राज्यमार्ग ६१ पवारवाडी ते मोगरा डिग्रस पोहनेर कासारवाडी कोडगाव हुडा ते राज्यमार्ग २३५ (लांबी २९ किमी) या १५ रस्त्यांची दर्जोन्नती होणार असून या रस्त्यांचे स्वरूप आता पालटणार आहे.

## पान १ वरून...

### मराठवाड्यातील २४ कोष

कोष उत्पादकांचा समावेश आहे. एकरी दीड लाखापासून पाच लाखांपर्यंत उत्पन्न मिळवणारे हे शेतकरी असल्याची माहिती रेशीम विभागाकडून देण्यात आली. मराठवाड्यातील जिल्हा रेशीम विकास अधिकाऱ्यांसह कर्मचारी उपस्थित होते.

-----------

### भाजपने हरियाणातील

असे जरांगे म्हणाले. हरियाणातले वातावरण इकडे जोडू नका, मुसंडी फुसंडी जमत नाही मराठ्यांनी फासा टाकला की गेलाच. इथे मराठ्यांची मुसंडी वेगळीच असते. मराठ्यांसोबत डोकं लावू नको, इथे आरक्षण द्यायचे बघा. फडणीस साहेब तुम्हाला डोकं आहे का? इथे प्रत्येक मतदारसंघात लाख लाख मतदान आहे, पूर्ण बुकटा वाजवून टाकू. तुमचे एकही सीट राज्यात निघू देणार नाही, तुम्ही निर्णय न घेता नुसती आचारसंहिता लावून दाखवा, तुमचे एकही सीट राज्यात निवडून येऊ देणार नाही, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह भाजपला इशारा दिला आहे.

-----------

### सत्यभामा बांगर अटकेत, १३

उत्तमराव सगळे, संभाजी विठ्ठलराव मसकर, भगवान साधू पाखरे, भगवान बाजीराव सोनवणे, राजेंद्र कारभारी गवळी, नवनाथ भगवान नागरगोजे, पांडूरंग निवृत्ती मस्के, रुक्मिणी सुदाम बांगर, रफिक महोम्मद पठाण, सिताबाई अरुण जावळे, बाबासाहेब भिमराव राख, रणजीत नारायण चौरे, सुरेश दत्तात्रय पुराणिक, प्रदिप दत्तात्रय कुलकर्णी, भीमराव बाजीराव सानप, दिनकर सिताराम बांगर, शामराव यशवंत कंठाळे (मयत), विष्णू विलास थोरवे, महादेव श्रीपती बांगर, राजाभाऊ नामदेव बावणे, बाळासाहेब शामराव बांगर, लक्ष्मण श्रीहरी शिंदे, नवनाथ भगवान नागरगोजे, बाबासाहेब भगवान नागरगोजे, हनुमंत रंगनाथ भोसले, प्रभाकर प्रभात गित्ते, प्रदिप बाबुराव गिरे, रविंद्र निवृत्ती उगले, जनार्धन मारोती कटाळे, गुलानभाई मेंगडे, रामचंद्र बाजीराव रांजवण, संजय भिमराव सानप अशा ४१ जणांवर कलम ४२०, ४०६, ४०९, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------

### राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचा

प्रश्न, सिंचन अनुशेष, जिल्हयातील पायाभूत सुविधा. 'उद्योगांसाठी पोषक वातावरण, ऊसतोड मजूरांचे स्थलांतर, आरोग्याच्या सुविधा, शहरातील पाणी प्रश्न यासारखे विषय मांडले. बीड जिल्हयातून मोठया प्रमाणात ऊसतोड मजूरांचे कामासाठी काही कालावधीसाठी स्थलांतर होते, त्यामुळे जिल्हयातच रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, केंद्र सरकारतर्फे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन भाषेचा गौरव करण्यात आला आहे. या मराठी भाषेतील प्रथम आद्य कवी हे बीड जिल्ह्यातील आहेत या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई येथे मराठी भाषेचे विद्यापीठ व्हावे, बीड शहरातील पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न सोडविण्यासोबतच कापूस उद्योगाला सहकार्य करावे. कापूस, सोयाबीनसह शेतीमालाला चांगला दर मिळावा, घरकुल योजना, शेतीसाठी वीज यासह विविध विषयावर चर्चागटात सहभागी मान्यवरांनी आपली मते मांडली. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी विविध घटकातील मान्यवरांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्याबाबत आश्वस्त केले. जिल्हाधिका-यांनी जिल्ह्यातील विविध योजनांचे सादरीकरण केले. या बैठकीला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत जिल्हयाचा ऐतिहासिक-सांस्कृतिक, भौगोलिक स्थिती व उद्योग तसेच जिल्हयात सुरू असलेल्या विविध कामाबाबत माहिती दिली.

------------

### पाच वर्षात जमलं नाही ते विजयसिंहांनी

वाद आजवर होत आले आहेत. केलेल्या कामाचे श्रेय घेण्यासाठी अक्षरश: विधवा, दिव्यांग आणि निराधारांना तहसिल कार्यालयात बोलावुन आमदारांच्या हाताने मंजुरी पत्र वाटप करण्याचे केविलवाने प्रकारही आजवर गेवराईत घडलेले आहेत. निराधारांमध्ये सुद्धा राजकारण करुन विशिष्ट गटाच्या लोकांना प्राधान्य देण्याचे प्रकार यापुर्वी घडले होते. लाच घेवुन अर्ज मंजुर केलेल्याचे आरोप यापुर्वीच्या समितीवर मोठ्या प्रमाणावर झाले. बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी मोठा मोर्चा काढुन या प्रश्नाला वाचा फोडली होती. शेवटी राज्यातील सत्तांतरानंतर त्यांनी राजकीय प्रतिष्ठापणाला लावुन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातुन नविन समिती गठीत केली. दादासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त समिती सदस्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करत तहसिल कार्यालयात आजवर प्रलंबित असलेल्या सुमारे १५६३० अर्जांची प्रत्यक्ष तपासणी केली. गेवराई तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने दि. २० सप्टेंबर रोजीच्या बैठकीत १२०६० अर्ज मंजुर केले आहेत. यामध्ये श्रावण बाळ निराधार ६८७४, संजय गांधी निराधार ५१५४ आणि इंदिरा गांधी वृद्धपकाळ निराधार योजने मधील ३२ अर्जांचा समावेश आहे. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर अर्ज मंजुर करण्याची गेवराई तालुक्यातील ही पहिलीच घटना आहे. समिती सदस्यांनी लाभार्थ्यांकडुन कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे काम केले आहे. त्यामुळे विरोधकही आमच्यावर आरोप करु शकत नाहीत. तालुक्यातील निराधारांना यामुळे खर्या अर्थाने न्याय मिळाल्याची भावना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके यांनी व्यक्त केली. त्यांनी पालकमंत्री ना. धनंजय मुंडे, माजी आ. अमरसिंह पंडित आणि बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले. यावेळी समितीचे सदस्य ज्ञानेश्वर नवले, सरवर पठाण, भारत गर्जे, बळीराम शिंदे, गोकुळ चोरमले, शाहीन पठाण, अनिरुद्र तौर, अंबादास सांगळे, शामसुंदर शिंदे आदींची उपस्थिती होती. गेवराई तालुक्यातील निराधारांकडुन आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

-------------

### राज्य सरकारकडून १५ जातींचा ओबीसीत

पाटील यांच्या नेतृत्वात मराठा समाजाचे आंदोलन व मागणी अद्यापही सुरू आहे. त्यातच राज्य सरकारकडून इतर मागासवर्ग म्हणजेच ओबीसींच्या यादीत नव्या जाती समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने शिफारस केलेल्या जातींचा समावेश ओबीसीमध्ये करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, केंद्रीय मागासवर्ग आयोगाकडून जातींची यादी केंद्र सरकारकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती आहे.

**या जातींचा समावेश करण्याची शिफारस**

बडगुजर, सूर्यवंशी गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, पोवार, भोयार, पवार, कपेवार, मुन्नार कपेवार, मुन्नार कापू, तेलंगा, तेलंगी, पेंतारेड्डी, रुकेकरी, लोध लोधा लोधी, डांगरी.

------------

### २५० सोलर हायमास्टने बीड

अंधार दूर करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत होती. या मागणीची दखल घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात येणार आहेत. तसेच, शहरातील अनेक जुन्या पोलवरील एलईडी पथदिवे बंद आहे. त्याठिकाणी देखील एलईडी पथदिवे बसविले जाणार आहेत. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून दिवाळीच्या आधीच बीड शहर उजळणार असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

**बीड मतदारसंघात कोट्यवधींची कामे सुरू**

बीड विधानसभा मतदारसंघात कोट्यवधींची विकासकामे प्रत्यक्षात सुरू आहेत. अनेक कामे पूर्णत्वास गेली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. रस्ते, नाल्या, पथदिव्यांसह विजेची कामे, सभागृह, अंगणवाडी, दवाखान्यांसह विविध दुरुस्तीच्या कामांचा देखील यामध्ये समावेश आहे. या कोट्यवधींच्या विकासकामांसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला आहे.

-------------

### गरिबांना २०२८ पर्यंत

ही योजना डिसेंबर २०२८ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे अशक्तपणा आणि पौष्टिकतेच्या कमतरतेने त्रस्त असलेल्या गरिबांना मोफत पौष्टिक धान्य मिळत राहील. या योजनेला संपूर्णपणे केंद्र सरकारकडून निधी दिला जाईल. याचा फायदा देशातील ८० कोटी लोकांना होणार आहे. ही योजना २०२२ मध्ये सुरू करण्यात आली होती.

----------

### पालकमंत्री धनंजय मुंडेंचे बीड

१ लाख २० हजार रुपये निधी दिला जातो. बीड जिल्ह्यातील तालुकानिहाय प्राप्त प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवण्याबाबत जिल्हास्तरीय समितीने निर्णय घेऊन प्राप्त प्रस्तावांची यादी राज्य शासनास सादर केली, त्यानुसार पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून तब्बल २८ हजार घरकुलांना एकाच वेळी मंजुरी देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यात तालुकानिहाय आकडेवारी पाहता, घरकुलांसाठी एकत्रित पणे इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले आहेत, धनंजय मुंडे यांच्या आग्रही भूमिकेमुळे हे होऊ शकले, असे बोलले जात आहे. जिल्ह्याच्या इतिहासात इतक्या मोठ्या संख्येने एका योजनेतून घरकुलांना मंजुरी मिळण्याची ही पहिलीच वेळ असून, यामध्ये सर्व तालुक्यांना न्याय देण्यात आला आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.१० ऑक्टोबर २०२४


## आम आदमी पार्टीला काँग्रेसने सोबत घेतले असते तर काँग्रेसचे पाच हजाराच्या फरकाने २८ आमदार पडले नसते-आप संघटनमंत्री प्रदिप थोरवे



म्हसोबावाडी : हरियाणात आम आदमी पार्टी वेगळी लढल्याने पराभव झाला ! २८ उमेदवार ५००० च्या फरकाने पडले!

इंडिया आघाडी तुटल्याचा परिणाम हरियाणा मध्ये दिसत आहे.आम आदमी पार्टी ला काँग्रेसने सोबत घेतलं असतं तर काँग्रेसचे पाच हजाराच्या फरकाने २८ आमदार पडले नसते.

गेल्या लोकसभेला देशातील आम अदामी पार्टी च्या कार्यकर्त्यांनी इंडिया आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार केला होता. त्यावेळी महाराष्ट्रात आप च्या कार्यकर्त्यांच कौतुक शरद पवार, सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे यानी केलं होत. परंतु फक्त कौतुक करून चालणार नाही तर,राज्यात महाविकास आघाडीने या निकालातून गंभीर्याने बोध घ्यावा,आणि आम दमी पार्टी ला महाराष्ट्रात काही जागा देऊन एकत्र लढावं आणखी नव्याना सोबत घ्यावं पण वेगळं लढू नये.महाराष्ट्रात इंडिया आघाडी टिकवावी, अन्यथा पराभवाचा हरियाणा पॅटर्न वाट्याला येईल. असे प्रतिपादन आम आदमी पार्टी चे महाराष्ट्रचे संघटन मंत्री प्रदिप थोरवे यांनी केलं आहे.

# परळी हा येणाऱ्या काळात दिव्यांगांसाठी सर्वात जास्त सुविधा उपलब्ध करून देणारा मतदारसंघ असेल -ना.धनंजय मुंडे

## दिव्यांगांच्या हृदयातील वेदना ओळखणारा नेता म्हणजे ना.धनंजय मुंडे- डॉ.संतोष मुंडे

परळी । प्रतिनिधी

कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांतून दिनांक ७ ऑक्टोबर व ८ ऑक्टोबर रोजी श्रीनाथ हॉस्पिटल येथे कमी ऐकू येणाऱ्या / कर्णबधिर रुग्णांसाठी मोफत डिजिटल श्रवणयंत्र (कानाच्या मशीन) वाटप शिबीर अतिशय यशस्वी पणे संपन झाले .

तब्बल १००० कर्णबधिर नागरिकांना या डिजिटल श्रवण यंत्रांचे मोफत वाटप करण्यात आले आणि ३७०० पेक्षा जास्त नवीन नागरिकांनी आपली नाव नोंदणी केली. अशी माहिती दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष व शिबिराचे संयोजक डॉ. संतोष मुंडे यांनी दिली.या भव्य मोफत शिबिराचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते झाले.

या प्रसंगी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख जिल्हा शल्य चिकित्सक डॉ .थोरात साहेब,श्रीनाथ मानव सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ एकनाथ मुंडे,बीड जिल्ह्याचे गटनेते अजयजी मुंडे,परळी तहसीलचे उपविभागीय अधिकारी लाटकर साहेब, तहसीलसर व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार रुपणर साहेब,राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके ,परळी मेडिकल असो.अध्यक्ष डॉ.शालिनीताई कराड ,सचिव डॉ. मनोज मुंडे ,पवन मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या उद्घाटप्रसंगी बोलताना परळी हा येणाऱ्या काळात



दिव्यांगांसाठी शक्य तितक्या सुविधा उपलब्ध करून देणारा मतदार संघ असेल असे धनंजय मुंडे म्हणाले. डॉ.संतोष व त्यांची टीम दिव्यांगांना विविध सहाय्यक उपकरणे मोफत उपलब्ध करून देण्यासाठी सतत शिबिरे घेत असतात. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे असेही ते पुढे बोलताना म्हणाले. तदनंतर या शिबिराचे संयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी प्रास्ताविकात बोलताना दिव्यांगांच्या हृदयाच्या वेदना जाणून घेणार नेता म्हणजे ना.धांजय मुंडे आहेत असे उद्गार काढले .

आणि या मोफत वाटप केलेल्या १००० श्रवण यंत्राच्या माध्यमातून १००० गरजू दिव्यांगाच्या जीवनात एक अमुलाग्र बदल होईल असेही ते म्हणाले.अशा भव्य मोफत दोन दिवसीय शिबिरामध्ये परळी मतदार संघातील तब्बल १००० कर्णबद्धिर नागरिकांना मशिनद्वारे तपासणी करून श्रवण यंत्रांचे वाटप करण्यात आले .तसेच ३७०० पेक्षा जास्त नागरिकांची नवीन नाव नोंदणी करण्यात आली .१००० श्रवण यंत्रांचे वाटप करणारे हे मराठवाड्यातील सर्वात मोठे शिबीर आपल्या परळी मतदार संघामध्ये ना.धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून यशस्वी संपन्न झाले अशी माहिती या शिबिराचे संयोजक डिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी सांगितले.

मोबाईलचा अतिवापर टाळावा - धनंजय मुंडेंचा सल्ला

माझा पीए कार्यक्रमाकडे येत असताना सांगत होता की मागच्या काही दिवसांपासून त्याला एका कानाने कमी ऐकायला येत आहे. सतत फोनवर बोलल्याने मोबाईलचा अतिवापर होत असल्याने मला सुद्धा एका कानाने कमी ऐकायला येते. आजच्या युगामध्ये कर्णबधीरत्व येण्यासाठी मोबाईलचा अतिवापर हे सुद्धा एक कारण बनले आहे, त्यामुळे मोबाईलवर मोजके व कामाचेच बोलावे तसेच मोबाईलचा अतिवापर टाळावा असा सल्लाही यावेळी धनंजय मुंडेंनी उपस्थितांना दिला.

## झटणाऱ्या हाताला आलेला फोडाचा शेवट तेव्हाच गोड होईल जेव्हा सर्व मराठा नारायण गडावर एकत्र येईल- किरण डावकर

### कधी गेलो शिवाजी पार्क तर कधी भगवानगड या वर्षी फक्त नारायण गड

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून विजय दशमीच्या निमित्ताने प्रत्येक पक्षाचा किंवा संघटनेचा दसरा मेळावा आयोजित होत आहे परंतु यावर्षी शेतकऱ्याच्या दीनदुबळया व कष्टकरी गोरगरीब जनतेच्या न्याय हक्कासाठी मराठा समाजाचा व अठरापगड सर्व जाती धर्मासाठी नारायणगड येथे भव्य दिव्य असे दसरा मेळाव्याचे आयोजन सुरू आहे या अनुषंगाने नारायण गड परिसरात सर्व येणाऱ्या लोकांचे गैरसोय होऊ नये यामुळे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशावरून



सर्व गोष्टीची बारकाईने लक्ष देऊन तयारी चालू आहे जेणेकरून येणाऱ्या बांधवांची पार्किंगची व्यवस्था किंवा राहण्यापासून ते जेवण्यापासून सर्व गोष्टीची व्यवस्था मोठ्या प्रमाणात होत आहे दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी असे हजारो हात राबत आहेत बाहेरून येणाऱ्या भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही त्यांच्या पायात काटा देखील टोचणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जात आहे एवढे ऊन डोक्यावर घेऊन हजारो हात येथे झटत आहेत एवढेच नव्हे तर तरुणा बरोबर वयोवृद्ध ची सुद्धा उपस्थिती लक्षणीय आहे झटणारे हाताला आलेल्या फोडाचा शेवट तेव्हाच गोड होईल जेव्हा येते लाखो भाविक व मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहील त्यामुळे येणाऱ्या १२ तारखेला नारायणगड येथे आपण सर्वांनी आपल्या कुटुंबाबरोबर व आपल्या मित्रपरिवार बरोबर मोठ्या संख्येने उपस्थित राहून या होऊ घातलेल्या दसऱ्या मेळाव्याची शोभा वाढवावी व संघर्ष युद्ध मनोज दादा तरंगे पाटील यांचे हात बळकट करावे असे मराठा बांधव सामाजिक कार्यकर्ता किरण डावकर यांनी सर्व बांधवांना आवाहन केलं आहे.

## वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित विविध स्पर्धांना उदंड प्रतिसाद

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या चंपारण्य ग्रीन क्लब व प्राणिशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने साजरा होत असलेल्या वन्यजीव सप्ताहानिमित्त ८ ऑक्टोबर रोजी आयोजित रांगोळी, चित्रकला, निसर्ग भेटकार्ड व वक्तृत्व स्पर्धांना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

या विविध स्पर्धांचे उद्घाटन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, ग्रीन क्लबचे समन्वयक प्रो. महादेव



काळे, प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रो. प्रशांत पाटील उपस्थित होते.

सहभागी विद्यार्थ्यांनी निसर्ग व वन्यजीव या विषयावर सुबक व आकर्षक चित्रे व रांगोळ्या साकारल्या. वक्तृत्व स्पर्धेतही वन्यजीव संरक्षणविषयी विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. शहरातील भामेश्वर विद्यालय, प्रियदर्शनी कन्या विद्यालय, क्रांतिसिंह नाना पाटील विद्यालय चुंबळी, लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, वसंतदादा पाटील महाविद्यालय अशा विविध शाळा महाविद्यालयातून एकूण २१० विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.दिलीप गिऱ्हे, प्रा. जगन्नाथ पटाईत, प्रा. रविंद्र शिंदे, मु.अ. हरिभगत सर, सचिन खोले सर, प्राचार्य नजीर पठाण, प्रताप नवले सर, सानप सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राज्यस्तर शैक्षणीक व्हिडिओ निर्मितीच्या खुल्या स्पर्धेत रेशमा परवीन तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात तिसरी

**पाटोदा । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ११ मे २०२३ नुसार शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन ई साहित्य निर्मितीची चळवळ उभी रहावी .यासाठी राज्यातील सर्व माध्यमांच्या , सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक/ शिक्षक - प्रशिक्षक स्तरावरील, शिक्षक ,मुख्याध्यापक व शिक्षक प्रशिक्षक यांचे साठी '' राज्यस्तर दर्जेदार शैक्षणीक व्हिडिओ निर्मिती ची खुली स्पर्धा २०२३-२४ चे शासनामार्फत आयोजन करण्यात




आले होते.यामध्ये श्रीमती रेशमा परवीन यांनी तालुक्यात प्रथम तर जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजीत शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ घेण्यात आली होती या स्पर्धेत श्रीमती रेशमा परवीन ( स. शिक्षिका) जिल्हा परिषद उर्दु प्राथमिक शाळा अरब गल्ली पाटोदा यांनी गट. ३ ते ५

विषय.. परिसर अभ्यास मध्ये तालुका स्तरा वर प्रथम क्रमांक प्राप्त केला तसेच जिल्हास्तरावर तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. या प्रसंगी शाळेचे शिक्षक *श्री. इम्रान सरांनी व झीनत बाजींनी आणि जिल्हा परिषद उर्दु शाळा पाटोदा चे मूख्या. श्रीमती. तस्नीम बाजी व आसेफा बाजी तसेच शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष, सदस्यांनी श्रीमती रेशमा परवीन बाजीचे सत्कार अभिनंदन केले व उल्लेखनीय कामगिरी बद्दल पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## जालन्यातील महिला आयटीआय तात्काळ सुरू करण्याची आ. गोरंट्याल यांची राज्यपालांकडे मागणी

**जालना । प्रतिनीधी**

मागील पंधरा वर्षापूर्वी जालना येथे मुलींसाठी मंजूर करण्यात आलेली औद्योगिक प्रशिक्षण संस्था अपेक्षित असलेल्या पदे आणि यंत्रसामुग्रीसह तात्काळ सुरू करावी अशी आग्रही मागणी आ. कैलास गोरंटयाल यांनी राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेऊन केली. दरम्यान, या बाबत सकारात्मक प्रतिसाद देत सदर संस्था कार्यान्वित करण्याबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल अशी ग्वाही राज्यपालांनी यावेळी दिली.

जालना येथील नव्याने सुरू करण्यात आलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाचा शुभारंभ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. जालना येथील जिल्हा प्रशासकीय इमारतीमधील महसूल भवन मध्ये आयोजित करण्यात आलेल्या या



कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमानंतर जालन्याचे आ.कैलास गोरंटयाल यांनी राज्यपालांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि. २६ जुन २००९ रोजी काढलेल्या एका शासन निर्णयाद्वारे राज्यातील महिलांसाठी २० नविन औद्योगीक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास तत्वतः मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये जालना येथील औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचा देखील समावेश आहे. मात्र, शासन निर्णय निघून आता तब्बल १५ वर्षांचा कालावधी उलटूनही जालना येथील महिलांसाठीची औद्योगीक प्रशिक्षण संस्था सुरु झालेली नाही ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे आ. गोरंटयाल यांनी या निवेदनात म्हटले आहे. सदर प्रशिक्षण संस्थेला मंजुरी दिल्यानंतर प्रशिक्षणासाठी लागणारी तांत्रिक पद भरती, लिपीकवर्गीय पदभरती तसेच त्यांना शिकविण्यासाठी लागणारी यंत्र सामुग्री व साधन सामुग्री या बाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने अद्याप महिलांसाठीची औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु झाली नसल्याचे निदर्शनास आणून देत जालना हे औद्यागीक शहर असून ३ फेज मध्ये औद्योगीक क्षेत्र कार्यान्वीत आहे. स्टील उद्योगासह इतर छोटे मोठे उद्योग चालू आहेत. त्यांना कुशल कामगारांची आवश्यकता असून जालन्या सारख्या अविकसीत भागात महिलांसाठीचे प्रशिक्षण सुरू झाल्यास उद्योगांना प्रशिक्षीत कुशल कामगार मिळतील, महिलांना सुध्दा रोजगार मिळेल याकडे आ. कैलास गोरंटयाल यांनी राज्यपालांचे लक्ष वेधून आपण स्वतः या प्रकरणात लक्ष घालून १५ वर्षापुर्वी मंजुर असलेली महिला औद्योगीक प्रशिक्षण संस्था तात्काळ सुरू करावी अशी मागणी आ. गोरंटयाल यांनी राज्यपालांना दिलेल्या या निवेदनात केली आहे. यावेळी आ. राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### बियाणे समिती : केंद्रीय

देणे, राज्यासाठी पिकांच्या नवीन जाती घेण्याचा विचार करणे, राज्यात नव्याने प्रसिद्ध झालेल्या वाणांच्या कामगिरीवर लक्ष ठेवणे ही या समितीचे प्रमुख कार्य आहेत. या उपसमितीचे मुख्यालय मुंबई येथे असणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या सचिव या समितीच्या अध्यक्ष आहेत. तर कृषी आयुक्त, बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सर्व कृषी विद्यापीठांचे संशोधन संचालक आणि कृषी विभागाशी संबंधित विविध उपक्रमांचे पदाधिकारी हे सदस्य आहेत.

नवनियुक्त तीनही पदाधिकाऱ्यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे व आ.पंकजाताई मुंडे यांसह माजी आ.संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर आबा चव्हाण, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

बियाणे समितीवरील तीनही पदाधिकाऱ्यांबद्दल :

गोविंदराव देशमुख हे परळी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष असून अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे ते माजी सभापती आहेत, याशिवाय परभणी कृषी विद्यापीठाचे कार्यकारी परिषदेचे सदस्य होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य म्हणून सध्या ते कार्यरत आहेत. कृषी पदवीधर असलेले गोविंदराव देशमुख हे प्रगतशील आधुनिक शेतकरी असून शेती विषयक जाणकार आहेत.ऍड.विष्णुपंत सोळंके हे परळी तालुक्यातील नागापूर येथील रहिवासी असून अंबाजोगाई येथील न्यायालयात ते वकिलीची प्रॅक्टिस करतात. मागील वीस वर्षापासून ते कॉटन फेडरेशनचे संचालक आहेत तसेच उपाध्यक्ष म्हणून कार्यरत राहिलेले होते. ते स्वतः कृषी उद्योजक असून कापूस जिनिंग सारखे कृषिपुरक उद्योग त्यांनी उभे केलेले आहेत. कापूस बियाण्यांचे उत्तम अभ्यासक म्हणून त्यांची ओळख आहे.अतुल मुंडे हे परळी खरेदी-विक्री संघाचे संचालक असून, मुंडेंच्या जन्मगाव नाथरा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व मागील पंधरा वर्षांपासून संचालक आहेत. तरुण वयात आधुनिक पद्धतीने प्रगतिशील शेती करणारे शेतकरी म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केलेली आहे. धनंजय मुंडे यांनी ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल गोविंदराव देशमुख ऍड विष्णुपंत सोळंके तसेच अतुल मुंडे यांनी श्री.धनंजय मुंडे व कृषी विभागाचे आभार मानले आहेत.

### गैरहजर सदस्यांना कारण

यांनी परिषदेला दिले. सरकारी आणि गैर-सरकारी अशा २८ सदस्यांचा समावेश असलेली परिषद ग्राहक-संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि उपाय शोधण्यासाठी स्थापन करण्यात आली होती. मात्र, सरकारी सदस्यांच्या निष्क्रियतेमुळे अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. बैठकीत अशासकीय सदस्यांनी ग्रामीण भागातील अपुरी बीएसएनएल सेवा, जालना शहरातील रस्त्यांवर लावलेले विजेचे खांब, भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव, विशाल कॉर्नरवरील पथदिव्यांचा अभाव, यासह विविध गंभीर समस्या मांडल्या. सायकल स्टँडवर जादा भाडे आकारणे आणि अन्न भेसळ. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्यात अपयश आले आणि तहसील स्तरावर परिषद बैठक घेतली. या बैठकीला संजय देशपांडे, नंदकुमार देशपांडे, शालिनी पुराणिक, संदीप काबरा, सतीश पंच, रमेश तारगै, अनिल मुंदडा, बाळासाहेब सोनटक्के, विजय जाधव आणि अहमद नूर कुरेशी यांच्यासह अनेक अशासकीय सदस्यांची उपस्थिती होती. सरकारच्या बाजूने वजन व माप विभागाचे आर.डी. दराडे, डी.व्ही. यांच्यासह काही प्रतिनिधी उपस्थित होते. पाटील, अन्न व औषध प्रशासनाकडून डी.बी. कृषी विभागाचे जगधने, जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे डी.एस.बोराडे, ए.एन. महावितरणचे चौधरी आणि अन्न पुरवठा कार्यालयाचे चव्हाण आदींची यावेळी उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### अखिल भारतीय पाचवी बौद्ध

ही अखिल पाचवी बौद्ध धम्मपरिषद प्रमुख दिग्दर्शक डॉ.भिक्खु उपगुरु महाथेरो पुराणा यांच्या मार्गदर्शन पार पडेल आणि धम्म पूर्णस बौद्ध उपासक, उपासिका यांनी मोठ्या भारतीयाने उपस्थित राहावे असे आवाहन मुख्य संयोजक पु. भिक्खु धम्मशील थेरो हिंगोली/बीड, स्वागताध्यक्ष डॉ. सुनील सरवदे (चेअरमन माऊली मल्टीस्टेट, नाशिक) यांनी केले आहे. या कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी ८.०० वा. डॉ. आंबेडकर सामजिक न्याय भवन बुद्धमुर्तीसह डॉ. बाबासाहेब मिर संघ, भिक्खु उपासक, उपासिका आशा धम्म नुकीस प्रारंभ होईल. मिरवणुकीचा मार्ग डॉ. बाबासाहेब सामाजिक न्याय भवन- शिवाजी महाराज पुतळा कारंजा बलभीम चौक टिळक रोड सुभाष रोड डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक असून येथे अभिवादन व धम्मध्वजारोहन करून नाळवंडी नाका- ते शिवणी येथे मिरवणुकीचा समारोप होणार आहे.

१२ जून रोजी मौजे शिवणी येथे १०.०० वा. ऐतिहासिक बोधीवृक्षाची पुजा आधिक पु.भिक्खु पज्ञाबोधी थेरो (अध्यक्ष नांदेड, जिल्हा भिक्खु संघ) यांच्या मुख्य धम्मध्वजारोहन होणार आहे. ते १० ते १२.०० यावेळेत भिम व बुद्ध गीतांचा सांकृतीक कार्यक्रम व मुख्य कार्यक्रम उदघाटन १२-०० शांत होणार नाही.अशी माहिती मुख्य संयोजक सचिव प्रियदर्शी धम्मसंकार संस्था,बीड पु. भिक्खु धम्मशील थेरो हिंगोली/बीड स्वागताध्यक्ष डॉ. सुनील सरवदे (चेअरमन माऊली मल्टीस्टेट, नाशिक) यांनी दिली आहे. बौद्ध उपासक उपासकांनी मोठ्याने उपस्थित राहावे असे आवाहन कचरू तात्या खळगे यांनी केले आहे.

### जागर भक्तीचा..सागर शक्तीचा..

म्हणजे भक्ती आणि शक्तीचा संगम मानला जातो. मेळाव्याच्या व्यासपीठावर अध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहतात. संत भगवान बाबा आणि लोकनेते मुंडे साहेबांना मानणारा मोठा वर्ग दरवर्षी पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी येत असतो. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील पंकजाताई मुंडे यांचे येत्या १२ तारखेला हेलिकॉप्टरने सावरगांवला आगमन होणार आहे. संत भगवान बाबांचे दर्शन घेऊन सकाळी ११ वा. त्या मेळाव्यास संबोधित करतील.

पोलिस अधिकाऱ्यांकडून सुरक्षेचा आढावा

राज्यातील एकंदर राजकीय परिस्थिती पाहता पंकजाताई मुंडे काय बोलणार? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष आहे. त्यांचे लाखो समर्थक त्यांना ऐकण्यासाठी भगवान भक्ती गडावर प्रचंड मोठ्या संख्येने दाखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने याठिकाणी मोठा बंदोबस्त तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात पोलीस प्रशासनाकडून एकूणच सुरक्षेचा आढावा घेण्यात येत आहे.

### शिवसैनिकांनो, विधासभेची

बीडमधील अनिलदादांचा सुरु झालेला झंझावात विधान भवनात पोहचला पाहिजे- अर्जुनराव खोतकर

बीड मतदारसंघांमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचा झंजावात सुरू झालेला दिसून येत आहे हा झंझावात विधानसभेच्या सभागृहात पोहोचविण्याकरिता आपल्या सर्वांना मोठ्या ताकदीने कामाला लागले पाहिजे. याबरोबरच सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी देखील सर्व शिवसैनिकांना शिवधनुष्य उचलण्याची गरज असून महाराष्ट्रावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकविण्यात आपले योगदान देणे अत्यावश्यक आहे. असे शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्क नेते अर्जुनराव खोतकर यांनी आपल्या भाषणात शिवसैनिकांना आवाहन केले.

### विद्यार्थिनीनी घाबरून

प्रास्ताविक प्रा डॉ विनोद जगतकर यांनी तर अध्यक्षीय समारोप प्रा प्रसाद देशमुख यांनी केला. सुत्रसंचालन व आभार प्रा पी.एम फुटके यांनी मानले.कार्यक्रमास विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा बीड येथील बलभीम महाविद्यालयात आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धेत ८०० मीटर रनिंग रेस मध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी अश्विनी रावसाहेब राठोड हीचा तृतीय क्रमांक पटकावल्या बदल पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन व मार्गदर्शक क्रिडा संचालक प्रा डॉ प्रविण दिग्रसकर यांचा सत्कार करण्यात आला.

### तुम्ही फक्त कार्ड काढा, उपचाराची

आयसीआयसीआय बँकेचे क्लस्टर हेड मनीष पालीवाल, अनंत राऊत, उमेश गिरधारी, सुनिता पवार, अशोक जाधव, सुरेश गवळी, डॉ.नवनाथ चव्हाण आदींसह पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. स्वरूपसिंह हजारी यांनी आयुष्यमान भारत कार्ड बद्दल सविस्तर माहिती दिली. आयुष्यमान भारत ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजने इतक्या सुविधा देणाऱ्या योजना जगामध्ये कुठेही नाही असे सांगून ५० कोटी लाभार्थी या योजनेचा लाभ घेतील असा संकल्प या सरकारचा असल्याचेही डॉ. हजारे म्हणाले. योजना सुरू करायची आणि मतं घ्यायची एवढ्या पुरते या योजनेला मर्यादित न ठेवता सर्वसामान्य पर्यत पोहचली पाहिजे याची जबाबदारी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांची आहे. आयुष्मान भारत म्हणजे आयुष्य वाढवण्याचा प्रयत्न आहे या योजनेअंतर्गत तेराशेच्या वर दुर्गम आजारावर पाच लाखापर्यंत विलाज होत असल्याने आयुष्यमान भारत योजनेची जागतिक स्तरावर कौतुक झाले आहे असी माहिती डॉ. स्वरुपसिंह हजारी यांनी दिली. राशन कार्ड व बारा अंकी नंबर असेल तरच आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड काढता येते मात्र आजही ३० टक्के नागरिकांकडे रेशन कार्ड नसल्याने अशा लोकांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे अशा वंचित लोकांनी आपल्या दारात येणाऱ्या या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून जास्तीत जास्त कार्ड काढून योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन या योजनेचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजक नगरसेवक बालाजी चव्हाण, सुरेश लोकरे, दत्ता धोत्रे, मोहन भोसले, सचिन दुबे,नदीम मोमीन, सुमित दुबे सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड मोहन भोसले यांनी तर आभार देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर यांनी मानले.

cmyk


राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि. १० ऑक्टोबर २०२४
४

# नगदी पिकांपेक्षा रेशीम शेतीतून जास्त उत्पन्न - मंत्री चंद्रकांत पाटील

मुंबई : इतर नगदी पिकांपेक्षा रेशीम शेतीतून जास्त उत्पन्न शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळून आर्थिक विकास साधावा, असे आवाहन राज्याचे तंत्रशिक्षण मंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

नियोजन भवन येथे छत्रपती संभाजी नगर व अमरावती विभागातील उत्कृष्ट रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा रेशीमरत्न पुरस्कार २०२३ चे वितरण करण्यात आले. यावेळी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील, खासदार अनिल बोंडे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा आदी उपस्थित होते. पाटील म्हणाले, कापसापासून ते तयार कपड्यापर्यंत साखळी निर्माण करण्यात येत आहे. बाजारपेठेतील विविध

## रेशीमरत्न पुरस्कार २०२३ चे वितरण




फॅशन्सप्रमाणे रेशीम वस्त्रांना बाजारपेठेत मोठी मागणी आहे. कापसा पेक्षा जास्त उत्पन्न रेशीममधून मिळत आहे. रेशीमला असलेली मागणी आपण अद्यापही पूर्ण करू शकलो नसल्यामुळे शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळविणे आवश्यक आहे. रेशीम शेती वाढल्यास प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी रेशीम खरेदीची व्यवस्था करण्यात येईल. याच धर्तीवर सोलापूर येथे केंद्र निर्माण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना उत्कृष्ट बियाणे, पाणी, खते, मार्गदर्शन आणि उत्पादीत मालाला भाव मिळाल्यास शेतकरी स्वयंपूर्ण होईल. त्याला शासनाच्या मदतीची आवश्यकता भासणार नाही. शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी यंत्रणांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. अल्पभूधारक शेतकरीही रेशीम शेती करू शकतो. पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांनी अन्य शेतकऱ्यांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# रांगडा कांद्याची लागवड करताना ही माहिती घ्या



महाराष्ट्रात अनेक भागात रांगडा कांद्याची लागवड होते कारण या हंगामात लागवड केलेल्या कांद्याची साठवणक्षमता खरिप हंगामापेक्षा उत्कृष्ट असते. रांगड्या कांद्याच्या लागवडीसाठी ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये रोपवाटिका तयार केली जाते आणि ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते. जाणून घेऊ या रांगडा कांद्याचे सध्या करावयाचे व्यवस्थापन.

रांगडा कांद्याचे व्यवस्थापन : एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी दोन ते तीन किलो बियाणे पुरेसे आहे. पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेत ठिबक किंवा स्प्रिंकलर सिंचन पद्धतीचा वापर करण्यासाठी जमिनीपासून १० ते १५ सें.मी. उंच, १ ते १.२ मीटर रूंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते आणि पाणी फार काळ साचून राहत नाही, रोपे कुजत किंवा सडत नाहीत, लावणीच्या वेळी सहज उपटून काढता येतात, रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना दर १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ४०० ग्रॅम पोटॅश प्रति २०० चौरस मीटर याप्रमाणे खते द्यावीत.

रुंदीशी समांतर ५-७.५ सें.मी. अंतरावर एक रेघा पाडून १-१.५ से.मी. खोलीवर बियाणे पेरावे. पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकून ठेवावे, नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने पाणी द्यावे. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून ८०० ग्रॅम प्रति २०० चौरस मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.

# कॅश क्रॉप पिकाच्या लागवडीतून मिळतो बक्कळ नफा

औषधी वनस्पती आश्वागंधाचे अनेक उपयोग आहेत. या पिकाची शेती करून खर्चपेक्षा आधीक उत्पन्न शेतकरी मिळवू शकतात म्हणूनच या पिकाला 'कॅश क्रॉप' म्हणून देखील ओळखले जाते. अश्वगंधा फळाच्या बिया, पाने, साल, देठ व मुळे विकली जातात व यास चांगली किंमतही मिळते. अश्वगंधाच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी सरकारही योजना राबवित आहे.

लागवडीसाठी या बाबी महत्वाच्या : अश्वगंधा लागवडीसाठी चिकणमाची आणि लाल माती अतिशय योग्य आहे. पीएच मूल्य ७.५ ते ८ दरम्यान असल्यास त्याचे उत्पादन चांगले होईल. गरम प्रदेशात याची पेरणी केली जाते. अश्वगंधा लागवडीसाठी २५ ते ३० डिग्री तापमान आणि ५००-७५० मिलीमीटर पाऊस आवश्यक आहे. रोपाच्या वाढीसाठी शेतात ओलावा असणे आवश्यक आहे. शरद ऋतूतील एक ते दोन पावसाळ्यात मुळे चांगली वाढतात.पर्वतीय प्रदेशातील कमी सुपीक जमिनीतही त्याची लागवड यशस्वीरित्या केली जाते.

पेरणी ते कापणी पर्यंतची प्रक्रिया : लागवड करण्यासाठी एक ते दोन चांगला पाऊस झाल्यावर शेतात नांगरणीनंतर जमिन समतल केली जाते. नांगरणीच्या वेळी शेतात सेंद्रीय खत घाला. दर हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे पेरणीसाठी पुरेसे आहे. अश्वगंधा पिकाची पेरणी दोन प्रकारे केली जाते. पहिली पद्धत रांग पद्धत आहे. यामध्ये, रोपापासून झाडाचे अंतर ५ सेंटीमीटर ठेवले जाते आणि ओळीपासून रेषेचे अंतर २० सेमी असते. दुसरी फवारणीची पद्धत आहे,




ही पेरणी पद्धतीपेक्षा चांगली आहे. हलकी नांगरणी वाळूमध्ये मिसळली जाते आणि शेतात शिंपडले जाते. चौरस मीटरमध्ये तीस ते चाळीस वनस्पती असतात. साधारणपणे ७ ते ८ दिवसांत बियाणे अंकुरतात. ८-१२ महिन्यांच्या जुन्या बियाण्यांमध्ये ७०-८० टक्के वाढ होते. पेरणीनंतर अश्वगंधाची कापणी जानेवारी ते मार्च या कालावधीत होते. उपटले जाते आणि झाडे मुळापासून विभक्त केली जातात. मुळाचे लहान तुकडे केले जातात. बिया आणि कोरडी पाने फळापासून विभक्त केली जातात. साधारणपणे अश्वगंधामधून ६०० ते ८०० किलो मूळ आणि ५० किलो बिया मिळतात. आपण अश्वगंधा औषधे बनविणार्या कंपन्यांना थेट विकू शकता बहुपयोगी आश्वगंधा : ही झुडुप वनस्पती आहे. अश्वगंधाला बहुवर्षीय वनस्पती देखील म्हणतात.- त्याची फळे, बियाणे आणि झाडाची साल विविध औषधे तयार करण्यासाठी वापरली जातात. अश्वगंधाच्या मुळाला अश्वासारखा वास येतो. म्हणूनच त्याला अश्वगंध असे म्हणतात. सर्व औषधी वनस्पतींपैकी सर्वात प्रसिद्ध वनस्पती आहे. अश्वगंधा तणाव आणि चिंता दूर करण्यात सर्वात फायदेशीर मानला जातो. याची पावडर बाजारात सहज उपलब्ध आहे.

# रब्बी हंगामात लसूण पिकाची लागवड

रब्बी ज्वारी, हरबरा, जवस, करडई, गहू इत्यादी पिकांसह या हंगातामात नोव्हेंबर महिण्यापर्यंत राज्यातील शेतकरी कमी अधिक प्रमाणात लसूण पिकाची लागवड करतात. यापिकातुन चार महिण्यात चांगले उत्पादन व पैसाही मिळतो. काढणीनंतर वर्षभर या पिकाची चांगला भाव मिळेपर्यंत साठवणही करता येते. म्हणून दररोज प्रत्येक घरातील स्वयंपाकाची चव वाढवणाऱ्या शिवाय औषधी गुणधर्म असणाऱ्या या पिकाची लागवड ते काढणी ची संपूर्ण माहीती घेतल्यास चांगला फायदा होऊ शकतो.

जमिनीची निवड व हवामामन : लसूणाचे कंद जमिनीत वाढत असल्याने पाण्याचा उत्तम निचरा होणारी भुसभुशीत कसदार जमीन या पिकासाठी निवडावी. लसूण लागवड करण्यासाठी थंड हवामान लागते. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात लागवड करावी. लसूण पक्व होत असताना व काढणीच्या काळात कोरडे हवामान आवश्यक आहे. पिकाच्या जातीमध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, श्वेता, यमुना सफेद, फाउंलाईट इत्यादिंचा समावेश होतो.

लागवडीची पद्धत : लसूणाची लागवड सपाट वाफ्यात करावी कारण लसुन जमिनीत खोल वाढतो. जमिनीत कुजलेले शेणखत २५ ते ३० टन मिक्स करून घ्या व जमिनीच्या उतारानुसार वाफे बांधावी४२/३२ मीटर अंतरावर सपाट वाफे करावीत. जमिनीला जास्त उतार असेल तर १.५ २ मीटर रुंद१०१२ सेमी लांबीचे वाफे करून



लागवड करावी. सपाट वाफे ची रुंदी१५ सेमी अंतरावर खुरप्याच्या साह्याने रेघा पाडून त्यांत १० सेमी अंतरावर उभ्या पाकळ्या रोवून मातीने झाकाव्यात .लागवडीच्या वेळी बियाणे दहा लिटर पाण्यात २० मिली कार्बोसल्फान व १५ गरम कार्बनडाझिम च्या द्रावणात दोन तास बुडवून लागवड करावी.

खत व्यवस्थापन : लागवडीच्या वेळी कुजलेले शेणखत २५ ते ३० टन जमिनीत मिसळाव .१०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावीत. नंतर उरलेली दुसरी नत्राची मात्रा दोन वेळा विभागून द्या. पहिली मात्रा लागवडीनंतर ३० दिवसांनी, दुसरी मात्रा लागवडीनंतर ४५ ते ५० दिवसांनी तसेच लागवडीच्या वेळी अमोनियम सल्फेट व सिंगल सुपर फॉस्फेट या खताचा उपयोग केल्यास गंधकाची मात्रा तयार होते.

पाणी व्यवस्थापन : लसणाची लागवड केल्यानंतर लगेच पाणी द्यावे. आंबवणी चार ते पाच दिवसांनी द्यावी. लसणाची मुळे १५ ते २० या थरात असतात त्यामुळे वरच्या थरात ओलावा असणे आवश्यक आहे .या पिकास आवश्यकतेनुसारपाणी द्यावे. पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.

रोगनियंत्रण : फुल किडी - ही नुकसानकारक किड आहे. सकाळी किंवा रात्रीच्या वेळी आक्रमण करते .ही पानावरील रस शोषून करते त्यामुळे पात पांढरी पडून वाकडी होते. पात वाकडी झाल्यास लसनाचे पोषण होत नाही. उपाय ,दहा लिटर पाण्यात स्टिकर घेऊन + कार्बोसल्फान २० मिली+ सापर मिथ्रीन १० मिली घेऊन फवारणी करावी. करपा - करपा हा बुरशीजन्य रोग आहे. या रोगामुळे पाण पिवळी पडतात आणि पानावर चट्टे वाढतात. पाणे सुकतात .उपाय २५ ते ३० मिलि डायथेन ४५ आणि कार्बनडाझिम २० मिली गरम स्टिकर १५ मिली घेऊन फवारणी करावी. कंदकूज उपाय - ही बुरशी लसनामध्ये वाढते ही बुरशी आत शिरल्याने पाकळ्या मऊ होतात व काळया रंगाचा थर जमा होतो. उपाय निरोगी बियाणे वापरावे लागवडीच्या वेळी वापरत भरपूर पाणी द्यावे.

लसणाची काढणी : लसणाचे पीक १२० ते १३० दिवसांत काढणीस तयार होते. लसणाची वाढ झाली की पानांची वाढ थांबते .पाने पिवळी पडतात. पाने वाळण्यापूर्वी काढणी करावी. जेणेकरून पेढी बांधणे सोपे जाईल. लसूण खुरप्याने किंवा कुदळीच्या सहाय्याने काढणी करावी. लसुन दोन दिवस शेतात तसाच ठेवावा. पातीने योग्य झाकावा. त्यानंतर जुड्या बांधणी करावी व झाडा खाली किंवा घरात वर बांधाणी करावी. हेक्टरी उत्पन्न १० ते १५ टन मिळते.




### महत्वाच्या घटना

१८४६ : एलियास होवे याला अमेरिकेत शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८९८ : लुइगी लुकेनीने ऑस्ट्रियाची राणी एलिझाबेथची हत्या केली.
१९३९ : दुसरे महायुद्ध कॅनडाने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४३ : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी रोम ताब्यात घेण्यास सुरूवात केली.
१९३६ : प्रथम जागतिक वैयक्तिक मोटरसायकल स्पीडवे चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली.
१९६६ : पंजाब राज्याचे विभाजन होऊन पंजाब व हरियाणा अशी दोन राज्ये अस्तित्वात आली.
१९६७ : जनमत चाचणीत जिब्राल्टरच्या जनतेने स्पेनमधे सामील होण्याऐवजी ब्रिटनमधेच राहण्याचा निर्णय घेतला.
१९७५ : व्हायकिंग-२ हे अमेरिकन मानवविरहित अंतराळयान मंगळ ग्रहाकडे झेपावले.
१९९६ : गोमंतक मराठी अकादमीचा पहिला 'कृष्णदास शामा पुरस्कार' गोमंतकीय मराठी साहित्यिक बा. द. सातोस्कर यांना तर 'पंडित महादेवशास्त्री जोशी मराठी साहित्य पुरस्कार' कवी नारायण सुर्वे यांना जाहीर
२००१ : मार्क इन्ग्रॅम या स्पर्धकाने फसवणूक करुन इंग्लंडमधील कौन बनेगा करोडपती ही स्पर्धा जिंकली.
२००२ : परंपरेने तटस्थ देश स्वित्झर्लंड देश युनायटेड नेशन्समध्ये सामील झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७२ : के. एस. रणजितसिंहजी कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (मृत्यू: २ एप्रिल १९३३)
१८८७ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे दुसरे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न (१९५७), मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (मृत्यू: ७ मार्च १९६१)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आर्थर कॉम्प्टन यांचा जन्म.
१८९५ : कविसम्राट तेलुगू लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू मनीष पांडे यांचा जन्म.
१९१२ : बसप्पा दानप्पा तथा बी. डी. जत्ती भारताचे ५ वे उपराष्ट्रपती, पाँडेचरी व ओरिसाचे राज्यपाल आणि मैसूर प्रांताचे मुख्यमंत्री, राष्ट्रपती फख्रुद्दीन अली अहमद यांच्या आकस्मिक निधनामुळे जत्ती यांच्यावर राष्ट्रपतीपदाची जबाबदारी आली. पाच महिने ते हंगामी राष्ट्रपती (मृत्यू: ७ जून २००२)
१९४८ : भक्ती बर्वे अभिनेत्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२१० : २१० इ.स.पू. : चीनची पहिले सम्राट किन शी हुआंग यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी २५९)
१९०० : रावबहादूर डॉ. विश्राम रामजी घोले महात्मा फुले यांचे सहकारी व नामवंत शल्यचिकित्सक (जन्म:)
१९२३ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (जन्म: ३० आक्टोबर १८८७)
१९६४ : श्रीधर पार्सेकर व्हायोलिनवादक (जन्म:१९२०)
१९८३ : नोबेल पारितोषिक विजेते स्वीस भौतिकशास्त्रज्ञ फेलिक्स ब्लॉक यांचे निधन.
२००० : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमीदल्ला यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १९२१)
२००६ : टोंगाचा राजा टॉफाहाऊ टुपोऊ यांचे निधन.

# द्राक्ष व्यापाऱ्यांना ओळखपत्र देण्याची मागणी



सांगली : द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी संबंधित द्राक्ष व्यापाऱ्यांना पोलिसांकडून ओळखपत्र देण्यात यावे, अशी मागणी द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष दत्ताजीराव पाटील यांनी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्याकडे केली.

या बाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की गेल्या तीन वर्षांच्या हंगामांमध्ये व्यापाऱ्यांकडून फसवणूक झाली आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे पैसे मिळण्यासाठी व येत्या द्राक्ष हंगामामध्ये द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, याकरिता द्राक्ष माल खरेदीसाठी येणाऱ्या व्यापारी यांची सर्व माहिती कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत गोळा करून त्याची एनओसी तयार करून पोलिस स्टेशनला पाठवावी व पोलिस विभागाकडून संबंधित व्यापाऱ्यास परवाना देण्यात यावा. कार्यक्रमावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुजय शिंदे, संघाचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

गेल्या तीन वर्षांत ज्या द्राक्ष उत्पादकांची फसवणूक झाली आहे त्यांनी व्यापाऱ्यांचे नाव, रक्कम या बाबतची माहिती पुराव्यासह द्राक्ष बागायतदार संघाकडे द्यावी. पोलिस प्रशासनाच्या मदतीने ही भरपाई रक्कम वसुलीसाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामुळे माहिती जमा करावी, असे आवाहन द्राक्ष बागायतदार संघाने केले आहे.

cmyk

# कोणत्याही धर्माची कट्टरता संविधानाला घातक-सरोदे



अंबाजोगाई । प्रतिनिधी

देशातील धार्मिकता अधिकाधिक कट्टर बनविण्याचे सर्व पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. अशी कट्टरता कोणत्याही धर्माची असो ती संविधानाला घातक असते, असे मत प्रसिद्ध विधीज्ञ अड. आसीम सरोदे यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, बीडचे माजी खासदार कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे प्रतिष्ठानच्या वतीने 'संविधान संवादा'चे अंबाजोगाई येथे आयोजन केले होते. त्यांच्या सोबत या संवादामध्ये अड. बाळकृष्ण निंबाळकर आणि अड. श्रीया आवले यांनीही सहभाग घेतला. संविधान कीर्तनकार, ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. भारतीय संविधानाची जागोजाग कशी पायमल्ली होते आहे, हे सांगताना आसीम सरोदे पुढे म्हणाले की, संविधानिक पदावर असलेली माणसे असंविधानिक वक्तव्य करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अलिकडेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी १४ मतदारसंघात 'व्होट जिहाद' झाला आहे असे अत्यंत बेजबाबदार वक्तव्य कोल्हापूर केले आहे. त्याबद्दल त्यांना आम्ही कायदेशीर नोटीस पाठविली आहे. तुम्ही मंत्रीपदाची शपथ घेत असताना स्पष्टपणे कुणाबद्दलही आकस ठेवून वागणार असे वचन दिलेले असते. तरी इथल्या मुस्लिम समाजाविषयी आकसाने, द्वेषाने बरबटलेली विधाने केली जातात. त्यांच्या देशभक्तीवर कायम शंका घेतली जाते. तिकडे देशाच्या पंतप्रधान पदी बसलेले नरेंद्र मोदी यांनी तर लव्हजिहाद, लॅण्ड जिहाद इतकच नव्हे तर फ्लड जिहादही म्हणत आहेत. ही भाषा अत्यंत असंविधानिक आहे. अमित शहा, नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात फडणवीस यांनी लोकशाहीचा नाश चालवला आहे असेही सरोदे म्हणाले. बदलापूर येथील चिमूरडीवर अत्याचार, त्यातील आरोपीचे इन्कांऊटर, समुद्रातील शिवाजी महाराज यांच्या स्मारकाबाबत भूमिकांबद्दल ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी टोकदार प्रश्न विचारले. त्याला सरोदे यांनी सडेतोड उत्तरं दिली अड. श्रिया आवळे. आणि अड. बाळकृष्ण निढाळकर यांनी पुणे येथे आसीम सरोदे, विश्वांभर चौधरी आणि निखिल वागळे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याची माहिती दिली. अड. अजय बुरांडे यांनी प्रास्ताविक भूमिका मांडताना सध्य परिस्थितीत संविधानाला निर्माण झालेला धोका आणि त्या पार्श्वभूमीवर कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे प्रतिष्ठान करीत असलेले काम याचा आढावा घेतला. कॉ. गंगाधर अप्पा यांनी आयुष्यभर शोषित आणि वंचित घटकाची बाजू मांडली. तोच वारसा प्रतिष्ठान पुढे चालवत आहे. त्याचाच भाग म्हणून संविधानला ७५ वर्षे होत असल्याचे औचित्य साधून 'संविधानाची गळचेपी होत आहे काय? असा आजचा संवाद ठेवण्यात आला होता. यापूर्वी या व्यानमालेत तिस्ता शटलवाड, राम पुनियानी, कॉम्रेड गोविंद पानसरे आदी विचारवंताची व्याख्याने झाली असल्याचे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सविता बनाळे तर कॉ सुहास चंदनशिव यांनी आभार मानले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नवरात्र उत्सवात योगेश्वरी मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई



अंबाजोगाई। प्रतिनिधी

आई राजा उदो उदो योगेश्वरी देवीचा उदो उदो या जयघोषात महाराष्ट्राचे शक्तीपीठ आणि भाविकांचे श्रध्दा स्थान असलेल्या योगेश्वरी मंदीरात घटस्थापना झाल्यानंतर ह्या शारदीय नवरात्र महोत्सवात मोठ्या भक्तीभावाने लाखो भाविक योगेश्वरीच्या दर्शनासाठी रात्रंदिवस गर्दी करीत आहेत.

रात्री मंदीर परिसर आकर्षक पद्धतीने केलेल्या विद्युत रोषणाईने उजळून निघाला असून विद्युत रोषणाईने सजलेले मंदिर भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे योगेश्वरी मातेच्या नवरात्र महोत्सवास मोठी परंपरा असून थाटामाटात देवल कमिटी संचालक, मानकरी,प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घटस्थापना करण्यात आली त्यानंतर त्या दिवशीपासून विविध सांस्कृतिक कार्यक्रम त्याचबरोबर भजन, कीर्तन,प्रवचन,पूजा विधी मोठ्या उत्साहात पार पडत आहेत. दिवसभर लाखो भाविक भक्तीभावाने देवी समोर नतमस्तक होऊन दर्शन घेत आहेत. अनेक तरुण देवीच्या जयघोषात श्रीफळ बांधण्यासाठी गर्दी करत आहेत दिवसेंदिवस भाविकांच्या रांगा वाढतच असल्याचे चित्र दिसून येत आहेत. सकाळी अभिषेक, देवीची नित्योपचार पूजा संपन्न झाल्यानंतर सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लागतात सध्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभुमीवर मंदिर परिसरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात असून जागोजागी पोलीस पहारा आणि नाकेबंदी करण्यात आलेली आहे दर्शनासाठी महिला, पुरुष यांची मोठी गर्दी होत आहे मात्र मंदीरास येण्या जाण्यासाठीच्या रस्त्यावर अतिक्रमण असल्याने या भागात पायी चालण्यासाठी किंवा वाहनांसाठी मोठी कसरत करावी लागत आहे याकडे संबधित प्रशासनाने लक्ष देण्याची भाविकांतून मागणी होत आहे.

## आष्टी तहसील कार्यालयावर गांधीगिरी आंदोलन



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तहसिलदार तथा न्यायदंडाधिकारी कार्यालय आष्टी यांच्या कार्यालयात आम्हां भारतीय नागरिकांना मानवी हक्काच्या सुविधा भेटत नसल्याकारणाने १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी तालुक्यातील संविधान प्रेमी नागरिक करणारं गांधीगिरी आंदोलन .

आष्टी तहसील कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सुविधा भेटत नाहीत. प्राथमिक सुविधा सुद्धा भेटत नाहीत . तहसीदार कार्यालय व परिसरात पिण्याचे पाणी स्वच्छ व मुबलक नाही. महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक व पुरुषांसाठी स्वतंत्र मुतारी संडासची सोय नाही. म्हणून कार्यालयाच्या कंपाउंड भोवती महिला पुरुषांना नैसर्गिक विधी करावा लागत आहे .कार्यालयात व परिसरात घाणीचे साम्राज्य आहे. गवत झाडे मोठमोठे झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या मावा खाऊन थुकीनें कित्येक परिसरात सडांपडलां आहे . कार्यालयातून देण्यात येणारे कागदपत्र, खसरा पत्रक, कुपन, शपथपत्र, संजय संजय गांधी, श्रावणबाळ योजना,फेरफिर व अन्य कागदपत्रं साठी कित्येक पैशाची अनाधिकृत नागरिकांची लुट सरास केली जात आहे. कुठेही नियमावलीचा बोर्ड नाही. किंवा वसूल केलेल्या रक्कम ची पावती भेटत नाही. नागरीकांच्या हक्काच्या सुविधाची कोणतीही माहिती कर्मचारी स्वतःहून जाहीर प्रकटन करीत नाही.

तहसिल मध्ये राजकीय पक्षा पाट्यांच्या लोकांचा हस्तक्षेप जास्त दिसून येतो. व कर्मचारी त्यांनाच प्राधान्य देतात. सर्वसामान्यांना मात्र ते कर्मचारी उद्धटपणाची वागणूक देत आहेत. हे सर्व १४ ऑक्टोबरच्या आतं थांबले नाहीत गांधीगिरी पद्धतीने आष्टी तहसील वर आंदोलन करण्याचा इशारा दिलेल्या निवेदनात समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके श्री.स्वप्निल शिवाजी पोटे युवा नेते शौकत पठाण धुळाजी लकडे अशोक माने कैलास दरेकर प्रा. राम बोडखे शेख अजमुद्दिन यासह आष्टी तालुक्यातील संविधान प्रेमी ग्रुपमेंबर यांनी गांधीगिरी आंदोलनाचा इशारा दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आला आहे.

## मुलींनो मोबाईलचे दुष्परिणाम ओळखा -प्रा.संतोष मोहिते

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मोबाईल व इंटरनेट याचे जीवनात होणारे दुष्परिणाम ओळखा ? असे आवाहन कॉम्प्युटर वर्ल्डचे संचालक प्रा.संतोष मोहिते यांनी केले. येथील इनरव्हिल क्लब ऑफ अंबाजोगाई व कंप्युटर वर्ल्ड यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती गोदावरी कुंकुलोळ योगेश्वरी कन्या शाळेत सायबर सुरक्षित मुली या विषयावर प्रा.संतोष मोहिते यांचे मार्गदर्शन झाले.

आजची ज्वलंत समस्या असलेल्या शालेय मुला मुलींचा वाढता इंटरनेट चा वापर, व त्यातून मुलीं वर होणाऱ्या दुष्परिणाम याची माहिती व्हावी. या उद्देशाने इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थीनींसाठी मोबाईल चा वापर किती , कुठे ,कसा सुरक्षित वापरावा. तसेच मोबाईल फोनचे दुष्परिणाम किती वाईट असतील या विषयाचे गांभीर्य ओळखून त्यांना सुरक्षित वापराचे तंत्र व नियम बाबत महत्त्वपुर्ण माहिती देण्यात आली.

तसेच कलचाचणी देणे किती महत्त्वाचे आहे. याचीही सर्वंकष माहिती मोहिते यांनी दिली. कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिक मिना कुलकर्णी , अंजली निर्मळे , मळेकर , स्मिता धावडकर, इनरव्हिल क्लबच्या अध्यक्षा सुरेखा सिरसट ,चंद्रकला देशमुख ,सुनिता कात्रेला ,वर्षा देशमुख यांची उपस्थिती होती.



## अंबड पालिकेकडुन बॅनर मुक्त शहर; बॅनर लावल्यास गुन्हा दाखल करणार-मुख्याधिकारी



शहरातील मुख्य रस्त्यावरील बहुतांशी सर्व होर्डिंग्ज हटवण्यात आले असून उर्वरित अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स , बनर संबंधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यापुढे शहरात कुठेही अनाधिकृत होर्डिंग्ज लावू नये. अनधिकृत होर्डिंग आढळून आल्यास दंड व पोलीस कारवाई करण्यात येईल
-डॉ.मनोज उकीर्डे मुख्याधिकारी

अंबड। प्रतिनिधी

नगर पालिकेच्या स्वछता विभागाने शहरात लावण्यात आलेले अनाधिकृत डिजीटल बॅनर काढुन टाकले असुन दि.८ रोजी सकाळी श्री. मत्स्योदरी देवी मंदिरापासून पालिका पथकाने बॅनर काढण्यास सुरुवात केली होती. अनधिकृत बॅनर-फ्लेक्सच्या विळख्यामुळे शहराचे विद्रुपीकरण झाल्याचे चित्र शहरात निर्माण झाले होते तत्कालीन मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी केलेल्या कारवाई नंतर काही दिवस रस्त्यावरील पथदिव्यांवर बॅनर लावले जात नव्हते मात्र नवराव उत्सवाचे शुभेच्छा देणारे आजी-माजी-भावी उमेदवार व समर्थकांकडुन शेकडो डिजीटल लावण्यात आले होते.

मुख्याधिकारी डॉ.मनोज उकीर्डे यांनी शहराला फ्लेक्स मुक्त करण्यासाठी कठोर पावले उचलली असुन त्यांच्या या निर्णयाचे नागरिकातून स्वागत होत आहे.अंबड नगर पालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी अनधिकृतरित्या बॅनर लावण्यात येतात वाढदिवस,जयंती,पुण्यतिथी तसेच विविध राजकीय पक्षांचे अनेक ठिकाणी बॅनर, फ्लेक्स लागतात. अनेकदा राजकीय पक्षांनी लावलेले बॅनर-पोस्टर्स फाटले किंवा फाडले जातात. त्यामुळे शहरामध्ये तणाव निर्माण होऊन कायदा सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. शहरामध्ये जे बॅनर लागले आहेत त्यात सर्वांचाच समावेश आहे. इतकेच नाही तर, आपल्या व्यवसाय-उद्योगाची फुकटात प्रसिद्धी करणारे बॅनरही झळकत आहेत.चौक,नाके,शासकीय इमारती येथे लागलेले बॅनर नंतर काढलेही जात नाहीत. काही ठिकाणी अनधिकृत लोखंडी होर्डिंग्ज उभे केले गेले असून पालिकेला कोणताही कर न भरता त्यावर जाहिराती केल्या जात आहेत.त्यामुळे पालिकेने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार शहरात एकही अनधिकृत बॅनर-पोस्टर्स लागू देवू नये अशी सुजाण नागरिकांतून मागणी होत आहे

## नाथ्रा येथे सुसज्ज बुद्ध विहार बांधून देण्याची मागणी

परळी। प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे नाथरा येथे सुसज्ज बौद्ध विहार बांधून देण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुकाध्यक्ष गौतम आदमाने यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री यांना एका निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत दिलेल्या निवेदनात त पुढे म्हटले आहे की,मौजे नाथ्रा ता. परळी वै. जि. बीड येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित स्मारकाची जागा ग्रामपंचायत नमुना नं ८ अ ला नोंद करूण पुतळ्या समोरील जिर्ण अवस्थेत असलेल्या सभागृहाच्या ठीकाणी सुसज्ज बौध्द विहाराची निर्मिती करूण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारकासाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

गावत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बऱ्याच वर्षा पासून अस्तित्वात आहे चळवळीतील जुन्या लोकांनी ते उभा केले आहे. स्मारकाच्या बाजूला स्मारकासाठी सोडलेली रिकामी जागा आहे. स्मारका समोर बऱ्याच वर्षा पासून बांधलेले जुने जिर्ण आवस्थेत सभागृह आहे. आडीच वर्षा पासून सरपंचानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नविन पुतळा आणून ठेवला आहे .स्मारकाच्या बांधकामासाठी निधी नाही म्हणून आडीच वर्षा पासून सरपंच , ग्रामसेवक ग्राम पंचायत कार्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बंदिस्त ठेवलेला आहे. सदरिल गाव हे पालकमंत्री धनंजय मुंडे तसेच माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांचे गाव असताना सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी निधी मिळत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## शैलेश आंधळे यांचा मार्निंग वॉक ग्रुपकडून सत्कार



वडवणी

वडवणी येथील,सकाळी मॉर्निंग वाकला जाणाऱ्या मित्रांचा एक ग्रुप असून त्या ग्रुपमध्ये एकूण २० सदस्य ओहेत स्वतःचे शारीरिक स्वास्थ्य जपत असताना वडवणी शहरामध्ये सतत घडणाऱ्या छोट्या मोठ्या नव-नवीन घटनेची दखल घेऊन एक सामाजिक स्वास्थ्य अबादित ठेवावाचे कार्य हा ग्रुप करताना दिसतो आहे अशा प्रकारचे विचार मा.आ.केशरावजी आंधळे यांनी व्यक्त केले.

याचा सविस्तर वृतान्तअसा की, वडवणी येथील प्रसिद्ध आडत व्यापारी श्री.भिकमशेठ आंधळे यांचे सुपुत्र शैलेश भिकमशेठ आंधळे यांची एमपीएससी च्या परीक्षेत महाराष्ट्रातून ४४ व्या रँकने उत्तीर्ण होऊन वर्ग - १ पदावर विराजमान झाल्याबद्दल सोमवार दि.७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ७:३० वाजता वडवणी येथील आनंद मंगल कार्यालयात सत्कार संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केशव आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष शेषेराव बापू जगताप तसेच बन्सीभाऊ मुंडे, बाबासाहेब महाराज मुंडे चारदरीकर, विठ्ठल महराज निळकंठेश्वर संस्थान, डॉ. पूर्भे, पांडुरंग अंडील अदीजण मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वर्ग-१चे मानकरी शैलेश भिकमशेठ आंधळे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मॉर्निंग वॉक ग्रुपचे जेष्ठ सदस्य वैजीनाथ बापू जाधव , श्री.दादारावजी शेंडगे, आनंद मंगल कार्यालयाचे मालक सुदाम तात्या शिंदे, बाबासाहेब मुंडे मुकदम , बिभीषण आंधळे, तुकाराम जाधव, प्रभाकर वेदपाठक, बाळकृष्ण तापडिया, कुंडलीक खाडे,श्रीराम पाटील सावंत, धस, रामनाथ डोईफोडे इत्यादी मॉर्निंग व ग्रुपच्या सदस्यांनी स्वागत करून शैलेश आंधळे यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष केशव आंधळे यांनी तसेच बाबासाहेब महाराज मुंडे , विठ्ठल महाराज, बन्सीभाऊ मुंडे उपनगराध्यक्ष, डॉ. पूर्भे यांनी समयोचित विचार व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.या सत्कार सोहळ्याच्या प्रसंगी वडवणी मार्केट कमिटीचे संचालक पांडुरंग अंडील, संचालक तथा युवा उद्योजक रणजीत धस, रवींद्र मुंडे, रामधन नागरगोजे, लक्ष्मण भंडारे, विनायक जाधव, अर्जुन मुंडे, प्रा. सी.व्ही मुंडे, गिन्यानदेव राठोड,गोविंद आंधळे, धाईतिडक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आंधळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार बिभीषण आंधळे यांनी मानले. स्नेहभोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी मॉर्निंग वॉक ग्रुपचे सर्व सदस्य तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित व्यक्ती पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/७२१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०४/१०/२०२४

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) राधा रमेश बुलबुले, रा भनंग जळगाव ता. अंबड जि. जालना

प्रकरण : सर्व्हे नं. ३४/२ प्लॉट नं. १ सि.स.न.१८६६/क/१ न.प.मि.न. १८-१०४-१/१ चे हस्तांतरण करणेबाबद

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१०४-१/१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नंबर २
पश्चिम : गणेश जयाजी गाढेकर
याच प्लॉटमधील भाग
दक्षिण-सहा मिटर रुदींचा रस्ता
उत्तरः सर्व्हे नं. ३४/२ मधील कंपाऊंट

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड



**जाहिर प्रगटन**
**मा. श्री.व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४९५/२०२४**
**ॲड. एस. आर. राजपुत यांच्या मार्फत**
**शेख गफूर पि. शेख अमीर वि. निरंक**

ज्यापेक्षा शेख अमीर शेख राज हे दिनांक ०९.०६.१९७६ रोजी गेवराई ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार १ शेख गफुर शेख अमीर वय ८१ वर्षे, धंदा काही नाही रा. युसुफिया मस्जीद जवळ सय्यद नगर, पांगरी रोड बीड ता.जि बीड अर्जदार क्र १ हा मयताचा मुलगा असुन या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदाराच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत शेख अमीर शेख राज यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २२/११/२०२४ आहे.

आज दिनांक ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित (शिक्का) स्वाक्षरित
कनिष्ठ लिपीक **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड



**जाहिर प्रगटन**
**मा. श्री.व्ही.सी.जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४६१/२०२४**
**ॲड. काचमांडे यु.ए. यांच्या मार्फत मिना चंद्रकांत गुंदेकर वि. निरंक**

ज्यापेक्षा चंद्रकांत भागवत गुंदेकर, रा. मौजे आंबेसावळी, ता. जि. बीड हे दिनाक ३१. ०८.२०१९ रोजी जिल्हा रूग्णालय, बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार १ मिना भ्र चंद्रकात गुंदेकर, वय-२९ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा.आंबेसावळी, ता.जि. बीड, २ बाजीराव पि चंद्रकांत गुंदेकर, वय-१२ वर्षे, धंदा शिक्षण, ३ करन पि.चंद्रकांत गुंदेकर, वय ०७ वर्षे, धंदा शिक्षण, ४ अर्जुन पि चंद्रकांत गुंदेकर, वय-०७ वर्षे, धदा शिक्षण अज्ञात अर्जदार २ ते ४ करिता अ.पा.क आई अर्जदार क्र १ रा. सदर.मंगल भ्र भागवत गुंदेकर, वय ६४ वर्षे, धंदा घरकाम रा.आबेसावळी, ता.जि.बीड ६. भागवत पि. बाबासाहेब गुंदेकर, वय ७४ वर्षे, धंदा शेती, रा आबेसावळी, ता.जि. बीड अर्जदार क्र १ ही मयत नामे चंद्रकांत भागवत गुंदेकर, यांची पत्नी असून, अर्जदार क्र २ ते ४ हे मयताचे अपत्ये असून, त्याची अपा.क. आई अर्जदार क्र १ ही आहे. अर्जदार क्र ५ ही मयताची आई असून, अर्जदार क्र ६ हे मयताचे वडील आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल नर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत. त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यान, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबदटल लागलीच पुगवा घेऊन, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास. त्यांना/अर्जदाराना सदरहू मयत चंद्रकांत भागवत गुंदेकर, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोट घ्यावी.प्रकरणाची पुढील तारीख ११/११/२०२४ आहे.

आज दिनांक ७ ऑक्टोवर २०२४ रोजी माइया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले

आदेशावरून
स्वाक्षरित (शिक्का) स्वाक्षरित
कनिष्ठ लिपीक **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड



दिनांक : ०९-१०-२०२४

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रविण हनुमंत शिंदे हे आहेत. त्यांनी सदर मिळकत विक्रीचा तोंडी करार आण्णासाहेब वामनराव मस्के सोबत केलेला आहे. आण्णासाहेब वामनराव मस्के यांचेकडून खालील कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. १) नोंदणीकृत विक्री करारनामा क्र. ३६८४/२०२० दि.२९-१०-२०२० ची मुळ दस्त नोंदणी पावती (ओआरआर) क्र. ६०८० दि.२९-१०-२०२० २) नोंदणीकृत खरेदीखत क्र. १५३/२०२१ दि.०७-०१-२०२१ चे मुळ पान क्र.५१ व ५२ ३) नोंदणीकृत खरेदीखत क्र. ११२७/२०२२ दि.१०-०३-२०२२ चे मुळ खरेदीखत दस्त व मुळ दस्त पावती (ओआरआर) सह ४) नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३२११/२०२३ दि.०५-०७-२०२३ ची मुळ दस्त नोंदणी पावती क्र. ५४५४ तथापी, वर नमूद कागदपत्रे आण्णासाहेब वामनराव मस्के यांचेकडून गहाळ झालेल्या आहेत. आण्णासाहेब वामनराव मस्के यांनी पोलीस स्टेशन, नेकनूर, ता.जि. बीड येथे सदर मुळ दस्त गहाळ झाले बाबत रजिस्ट्रेशन ऑफ लॉस्ट प्रॉपर्टी अंतर्गत नोंद क्र.०१७२/२०२४ दिनांक ०८-१०-२०२४ रोजी फिर्याद दिलेली आहे. वर नमूद कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद हद्दीतील फ्लॅट नं. बी-१ (२ बी.एच.के.), न.प. मालमत्ता क्र. १-३-८३२७, वक्रतुन्ड अपार्टमेंट, सर्व्हे नं. ४७ बीड तरफ बलगुजार, बार्शी रोड, बीड, ता. जि. बीड, ज्याची चतुः सिमाः- पुर्वेस ६ मीटर रूंदीचा रस्ता : पश्चिमेस : फ्लॅट नं.ए-१ दक्षिणेस : ६ मीटर रूंदीचा रस्ता उत्तरेस : फ्लॅट नं.सी-१

(शिक्का)

जाहीर नोटीस देणार
आण्णासाहेब वामनराव मस्के
मार्फत
स्वाक्षरित
डि.एस.आर. राजपुत, बीड
मो.नं. ९४२१३४५३४६

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक : प्रविण हनुमंत शिंदे**

राज्य लोकतंत्र
गुरूवार, दि. १० ऑक्टोबर २०२४ | ६

# शिवसैनिकांनो, विधासभेची जागा जिंकायची असेल तर मोठ्या ताकदीने कामाला लागा-डॉ. श्रीकांत शिंदे

## बीडमधील अनिलदादांचा झंझावात विधान भवनात पोहचला पाहिजे- अर्जुनराव खोतकर

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब तळागाळातील जनतेसाठी अठरा-अठरा तास काम करत लोककल्याणकारी योजना अमलात आणत आहेत त्यामुळे या योजनाचा लाभ घराघरात पोहचवा. मुख्यमंत्री शिंदे साहेबांची कुशल कार्यप्रणाली सामान्य जनतेपुढे मांडा. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आपला विजय पक्का आहेच. मात्र आपल्याला मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी आणि महाराष्ट्रावर आपल्या शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी मोठ्या ताकदीने काम करावे लागेल. बीड विधानसभेची जागा जिंकायची असेल तर शिवसैनीकांनो कामाला लागा, वेळ कमी राहिलेला आहे. बीड मतदार संघात जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप हे जोमाने काम करत असून आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत असे आवाहन करत अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी बीड मतदार संघात विकास कामाबाबत आमच्यासमोर यादी दिलेली आहे. येत्या काही दिवसात ती कामे आम्ही पूर्ण करू असे डॉ श्रीकांतजी शिंदे साहेबांनी शिवसैनिकांना अश्वस्त केले. बीड विधानसभेच्या तोंडावर काल दि. ८ ऑक्टोबर रोजी दु ३.०० वाजताच्या दरम्यान बीड नगरीत शिवसेना नेते संसदरत्न खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानसभा जनसंवाद दौरा



मेळावा संपन्न झाला. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांनी शिवसैनिकांशी मुक्त



संवाद साधल्याने बीड शिवसैनकांच्या अंगी नवीन ऊर्जा संचारल्याचे दिसून येत आले. याप्रसंगी शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, बाप्पूसाहेब मोरे यांच्यासह शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी- लोकप्रतिनिधी, महिला-भगिनी, शिवसैनिक आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पान ३ वर

### क्षीरसागर मुक्त बीड हा जनतेचा निर्धार; अनिलदादांसाठी बीड मतदार संघात अनुकूल परिस्थिती- सचिन मुळूक

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागर विरोधात बीडकर आता क्षीरसागर मुक्तीचा नारा देऊ लागले आहे त्यामुळे लबाड क्षीरसागरांना धडा शिकवण्यासाठी आणि या बीड मतदार संघाचा विकास करण्याकरिता अनिल दादा जगताप यांच्याशिवाय पर्याय उरलेला नाही व सध्या बीड मतदारसंघात सर्वोपरी अनिल दादा जगताप यांच्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे. यामुळे बीड मतदार संघावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा अनिल दादा जगताप यांच्या माध्यमातून फडकविल्या जाईल अशी भावना शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक यांनी संसदरत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त केल्या.

### मी घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे- अनिलदादा जगताप

खूप दिवसांपासून अन्याय सहन करतोय. प्रत्येकवेळी मला थांबवण्यात आले व माझा पाय ओढण्यात आला. मात्र आता मी आता घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे. बीड मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. कार्यकर्त्याला मोठं करण्यची, त्यांना ताकद देण्याची दानत मुख्यमंत्री शिंदे साहेबांमध्ये आहे व शिंदे साहेबांचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठबळ माझ्यासोबत आहे म्हणून मला यावेळी कसलीच चिंता राहिली नाही. शिवसैनिकांनो, अफवांवर विश्वास ठेऊ नका बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे आशीर्वाद आणि डॉ श्रीकांतजी शिंदे साहेबांचे सहकार्य आपल्यासोबत आहेत त्यामुळे आपला विजय पक्का आहेच आता तुम्ही कामाला लागा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड विधानसभा जन संवाद दौरा मेळाव्यात केले.

## लिंबाजी गिराम यांची ग्राहक रक्षक समितीच्या जिल्हा कार्यकारणीवर निवड

**परभणी । प्रतिनिधी**

पत्रकारीते सह सामाजीक क्षेत्रातहि जिल्हा भरात पत्रकार मनुन नाव लौकीक असलेले अभ्यासु व्यक्तीमत्व मनुन संबोधले जानारे सर्व परीचीत असलेले लिंबाजी गिराम कौसडीकर यांची ग्राहक रक्षक समितीच्या जिल्हा मिडीया प्रमुखपदि दिं.०९ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.सौ.आशाताई पाटिल यांच्या यांच्या वतीने निवड करण्यात आली आहे.

ग्राहक रक्षक समितीच्या वतीने डॉ.सौ.आशाताई पाटिल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरातच नव्हेतर महाराष्ट्र राज्यातही सामाजिक कार्याची घौडदौड दिवसेन दिवस एक पाउल पुढे पडताना दिसत आहे.

महाराष्ट्र राज्यासह प्रतेक जिल्हात कार्यकरणीची निवड करण्यात येत आहे या मध्ये परभणी जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष



गोपाळ कच्छवे व महाराष्ट्र राज्य मीडिया प्रमुख राजेंद्र लहाने यांच्या यांच्या शिफारशीनुसार ग्रामीण भागाला विशेष प्राधाण्य देण्याच्या हेतुन सामाजीक प्रश्नाची जान असलेले जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील रहिवासी लिंबाजी गिराम यांची ग्राहक रक्षक समितीच्या मिडिया जिल्हा प्रमुख पदि नियुक्ती करण्यात आल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## जागर भक्तीचा..सागर शक्तीचा.. भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्याच्या तयारीला वेग

**पाटोदा । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव घाट येथील भगवान भक्तीगडावर सध्या दसरा मेळाव्याच्या तयारीने वेग घेतला आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दरवर्षी हा परंपरागत दसरा मेळावा अलोट जनसागराच्या साक्षीने मोठया उत्साहात पार पडत असतो, यंदाच्या या मेळाव्याकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. दरम्यान जिल्हा प्रशासनाने मेळाव्याला परवानगी दिली आहे.

येत्या १२ तारखेला दसरा आहे, त्या अनुषंगाने आपला दसरा, आपली परंपरा जपण्यासाठी संपूर्ण सावरगांव नगरी सज्ज होत असून सर्व ग्रामस्थ एकजुटीने कामाला लागले आहेत. मेळाव्याच्या



### पंकजाताईंचे होणार जोरदार स्वागत

भगवान भक्तीगडावरील १८ एकर परिसरात हा मेळावा होणार असून डागडूजी, परिसराची स्वच्छता आणि इतर कामांनी वेग घेतला आहे. पंकजाताई मुंडे यांच्या स्वागताची देखील ग्रामस्थांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मेळाव्यास राज्याच्या कानाकोपर्यातून तसेच बाहेरूनही लाखोंच्या संख्येने भाविक येतात, त्यांची गैरसोय होऊ नये याची खबरदारी घेण्यात येत आहे.

तयारीसाठी कार्यकर्त्यांच्या राज्यभरात ठिक ठिकाणी बैठका सुरू आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी दसरा मेळाव्याची परंपरा सुरू केली होती ती परंपरा पुढे भाजपच्या

### राष्ट्रसंत भगवान बाबांचे जन्मगांव स्वागतासाठी होतेय सज्ज

### आ. पंकजाताई मुंडे यांचे होणार हेलिकॉप्टरने आगमन

राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी अखंडपणे सुरू ठेवली आहे. मागील दहा वर्षांपासून संत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव येथे हा दसरा मेळावा होत असून त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने याठिकाणी संत भगवान बाबा यांचे भव्य दिव्य स्मारक उभारून परिसराला भगवान भक्तीगड असे नांव दिलेले आहे.

पंकजाताईंचे मार्गदर्शन हा मेळावा पान ३ वर

## दाऊतपूर येथे ह. भ. प. मधुकर महाराज सायाळकर यांचे कीर्तन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

तालुक्यातील दाऊतपूर येथील माजी सरपंच, ज्येष्ठ नागरिक कै.कोंडीबा देवराव बिडगर यांच्या पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त ह. भ. प. श्री. मधुकर महाराज सायाळकर यांचे कीर्तन होणार आहे. तरी किर्तनाचा व भोजनाचा लाभ घ्यावा असे आवाहन बिडगर कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले आहे.



परळी तालुक्यातील मौजे दाऊतपूर येथील माजी सरपंच, जेष्ठ नागरिक, सामाजिक, शैक्षणिक धार्मिक क्षेत्रातील व्यक्तीमत्व कै.कोंडीबा देवराव बिडगर यांच्या पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने अश्विन शु.१० (विजयादशमी) शनिवार दि.१२ ऑक्टोंबर रोजी सकाळी १२ ते २ ह. भ. प. श्री. मधुकर महाराज सायाळकर यांचे कीर्तन होणार आहे. परळी तालुक्यातील व शहरातील तसेच पंचक्रोशीतील सर्व गुणीजण महाराज, गायक, वादक, भजनी मंडळी तसेच ग्रामस्थ, नातेवाईक, परिसरातील भाविकांनी सुश्राव्य किर्तन ऐकण्यासाठी व भोजनासाठी श्री हनुमान मंदिर दाऊतपूर (परळी ते गंगाखेड रोडवर) येथे उपस्थित रहावे असे आवाहन ज्ञानोबा देवराव बिडगर, भिवा ज्ञानोबा बिडगर, अर्जुन ज्ञानोबा बिडगर, सुरेश ज्ञानोबा बिडगर यांनी केले आहे.

## अखिल भारतीय पाचव्या बौद्ध धम्मपरिषदेस मोठ्याने उपस्थित रहा - कचरु खळगे

**माजलगाव । प्रतिनिधी**

या वर्ष धम्मसंस्कार संस्था ,बीड व बीड येथील समस्त बौद्ध उपासक-उपासिका यांच्या बीड शिक्षण महाविहार धम्म शांती डॉ.भदन्त आनंद कौसल्यान नगर शिवणी येथे ६९ धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अखिल भारतीय बौद्ध धम्माचे बौद्ध धर्मगुरू येत्या शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी आले आहे.या सहजसद्धाटक म्हणून पुभिखु धम्मसेवक महारो (अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भिक्खु संघ) उक्थे अधिकार लाभणार आहे. विशेष अतिथी म्हणून श्रीलंका येथील राष्ट्रपतीचे धार्मिक सल्लागार मा.खा.पु. भदन्त अतुरलीय रतन महाथेरो (कोलंबो, श्रीलंका) विजय सीमा सीमा आहे. या धम्मपरीषदेचे अध्यक्ष पु.भिक्खु इंदवंस महाथेरो (कुशीनगर) हे प्रमुख धम्मदेसना पु.भिक्खु करुणानंद थेरो संभाजीनगर, भिक्खु डॉ.इन्दवंस महाथेरो कुशीनगर, पु.भिक्खु विज्ञप्तीस थेरोपज्ञ थेरोचा सिरसाळा, पु.भिक्खु,थेरोपज्ञ थेरोपज्ञ थेरोचा



सिरसाळा.नांदेड, पु.भिक्खु पज्ञाबोधी थेरो नांदेड, पु.भिक्खु धम्म सुगाता नागपुर, पु.भिक्खु बुद्धघोष हिंगोली, पु.भिक्खु चंद्रमुनी हिंगोली, पु.भिक्खु पज्जावर्धन हिंगोली, पु.भिक्खु नागसे अनुभव संभाजीनगर प्रमुख धम्मदेह होणार प्रमुख म्हणून विभागीय शिक्षण उपसंहार चालक संभाजीनगर अनिल साबळे, संगीत प्रमुख विभाग स.भु. अगदी छ. संभाजीनगर प्रो.डॉ. संजय मोहभागीय अधिकारी मागाव गौरव इंगोले, साहब ही उपविभागीय व्यवस्था आहे.

## गैरहजर सदस्यांना कारणे दाखवा नोटीस-रिता मेत्रेवार



**जालना । प्रतिनिधी**

ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण आणि जिल्हा स्तरावरील वाद मिटवण्याची जबाबदारी असलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर कारवाई होत नसल्याची टीका होत आहे. गेल्या सात महिन्यांत, अनेक सरकारी प्रतिनिधी वारंवार परिषदेच्या बैठकांना उपस्थित राहण्यास अपयशी ठरल्यामुळे तक्रारींचे निराकरण झाले नाही. सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या परिषदेच्या बैठकीत अशासकीय सदस्यांनी आपल्या चिंता व्यक्त केल्या. अतिरिक्त जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत परिषदेचे कामकाज सुरळीत नसल्याबद्दल नाराजी दिसून आली. अनेक स्मरणपत्रे आणि सूचना देऊनही, सरकारी प्रतिनिधी बैठकीला आले नाहीत. गैरहजर सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल, असे आश्वासन मेत्रेवार पान ३ वर

## विद्यार्थिनींनी घाबरून न जाता वेळेवर पोलीसांशी संपर्क करावा -पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

विद्यार्थिनीनी घाबरून न जाता वेळेवर पोलीसांशी संपर्क करावा संपर्क करणारांची नावे गुप्त ठेवली जातात असे प्रतिपादन संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी केले. ते लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींशी संवाद साधताना बोलत होते.

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या वतीने विद्यार्थिनींशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद



देशमुख, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, प्रा डॉ विनोद जगतकर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना श्री ढोणे म्हणाले की, विद्यार्थिनीनी महाविद्यालयात येताना जाताना कोणी त्रास देत असेल तर सहन करु नये वेळेवर पोलीसांशी संपर्क करावा, तुम्ही जर संपर्क केला नाही तर तुम्हाला आणखी जास्त त्रास होवू शकतो, तसेच तात्काळ ११२ नंबर वर संपर्क साधावा या नंबरवर संपर्क केला तर पाच ते दहा मिनिटात आपल्याला जाग्यावर पोलीस प्रशासनाची मदत मिळेल. तुम्ही उद्याच्या राष्ट्राचे भवितव्य आहात हे भवितव्य सक्षम असले पाहिजे. अन्याय सहन करु नका, अन्याला जाग्यावर ठेचले पाहिजे. कार्यक्रमाचे पान ३ वर

## बियाणे समिती : केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या उपससमितीच्या सदस्यपदी गोविंद देशमुख, विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालय अंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी आणि फलोत्पादन बियाणे उपसमितीच्या सदस्यपदी परळी वैजनाथ येथील गोविंदराव देशमुख, ॲड.विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने याबाबतचे परिपत्रक नुकतेच जाहीर केले आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने या पदाधिकाऱ्यांची शिफारस केली होती.



केंद्र सरकारच्या केंद्रीय कृषी मंत्रालया अंतर्गत केंद्रीय बियाणे समिती कार्यरत असते. ही समिती राज्यनिहाय उपसमित्यांची नेमणूक करते. बियाणे कायदा, १९६६ च्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींवर राज्य सरकारला सल्ला देणे, राज्यातील बियाणे कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि राज्य सरकार/केंद्रीय बियाणे समितीला नियतकालिक अहवाल पाठवणे, राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळेची तपासणी करणे आणि बियाणे कायद्यांतर्गत राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळा म्हणून घोषित करण्यासाठी तिच्या योग्यतेचा अहवाल राज्य सरकारला देणे, बियाणे कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी प्रोत्साहन पान ३ वर

## तुम्ही फक्त कार्ड काढा, उपचाराची जबाबदारी माझी - डॉ. ओमप्रकाश शेटे

### धारूर येथे आयुष्मान भारत कार्डच्या मोबाईल व्हॅनचे उद्घाटन संपन्न

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर व माजलगाव तालुक्यासाठी आयुष्मान भारत या योजनेचे मोफत कार्ड काढण्यासाठी मोबाईल व्हॅन उपलब्ध झाली आहे. या मोबाईल व्हॅनचा शुभारंभ आयुष्मान भारत योजनेचे महाराष्ट्राचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते करण्यात आला. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत या योजनेचा लाभ मिळावा यासाठी ही मोबाईल व्हॅन महत्त्वाचा दुवा



ठरणार आहे. तुम्ही फक्त कार्ड काढून घ्या, उपचाराची जबाबदारी मी घेतो असे आश्वासन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिले.

गावागावात, तांडे, वाडी, वस्त्यावर जाऊन आयुष्मान भारत योजनेचे मोफत कार्ड काढून देणाऱ्या मोबाईल व्हॅनचा शुभारंभ दि. ९ ऑक्टोंबर रोजी किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज कॉम्प्लेक्स येथे करण्यात आला. आयुष्मान भारत योजनेचे महाराष्ट्राचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांच्या शुभहस्ते दोन्ही व्हॅन चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. केशव आंधळे, डॉ. डॉ. मिनल राघमवार, पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ७८ महाविद्यालयांचे अनुदान रखडले; सहायक प्राध्यापकांचे पुन्हा बेमुदत उपोषण

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील कायम विनाअनुदानित धोरण लागू होण्यापूर्वी अस्तित्वात आलेल्या ७८ कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाची आस लागली आहे. राज्य शासनाच्या वित्त विभागाकडे अनुदानाची फाइल गेल्या काही महिन्यांपासून धूळखात पडली आहे.




वित्तमंत्री, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांना अनुदानाचा निर्णय घेण्यासाठी मुहूर्तच सापडत नसल्याने ही अनुदान प्रक्रिया रखडली असून, तातडीने अनुदान मिळावे, यासाठी सहायक प्राध्यापकांनी आता पुन्हा बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले आहे. राज्य शासनाने २४ नोव्हेंबर २००१ रोजी कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारले. त्यानंतर मान्यता देण्यात आलेल्या एकाही महाविद्यालयाला अनुदान दिलेले नाही. कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारण्यापूर्वी विनाअनुदानित महाविद्यालय म्हणून मान्यता असलेल्या महाविद्यालयांना अनुदान द्यावे, अशी मागणी शासनाकडे अनेकदा करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापकांनी अनेकदा तीव्र आंदोलनेही केली. मुंबई येथील आझाद मैदानावर दीड वर्ष धरणे आंदोलन सुरू होते. तरीही शासनाने निर्णय घेतला नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकात पाटील यांनी केवळ आश्वासनाच्या पोकळ घोषणा केल्याचा आरोप सहायक प्राध्यापकांनी केला आहे.

अनुदानाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या मागणीसाठी गेल्या पाच दिवसांपासून उच्च शिक्षण संचालनालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले असून, त्यामध्ये शहाजी मरशिवणे, हनुमंत कुरे यांच्यासह अन्य प्राध्यापकांनी सहभाग घेतला आहे. गेल्या २३ वर्षांपासून महाविद्यालयांना एक रुपयाही अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागतो आहे. आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी तरी राज्य शासनाने अनुदानाचा तिढा सोडवावा, असा आग्रह शासनाकडे धरण्यात आला आहे.

# पतंजली विद्यापीठाला नॅकची ‘ए प्लस’ श्रेणी

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेकडून (नॅक) ‘युनिव्हर्सिटी ऑफ पतंजली’ला ‘ए प्लस’ श्रेणीचे मूल्यांकन मिळाले आहे. राष्ट्रीय पातळीवरील योग विद्यापीठाला मिळालेली ही सर्वाधिक उच्च दर्जाची श्रेणी आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेकडून मूल्यांकन मिळाल्यानंतर विद्यापीठाचे कुलपती आणि योगगुरू रामदेवबाबा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू आचार्य बाळकृष्ण, भारतीय शिक्षा बोर्डाचे कार्याध्यक्ष डॉ. एन. पी. सिंह, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. श्रीनिवास वरखेडी आदी मान्यवर उपस्थित होते.



रामदेवबाबा म्हणाले, ‘‘देशाचा सर्वांगीण विकास आणि आत्मनिर्भर राष्ट्र विकसित करण्यासाठी सक्षम तरुण महत्त्वपूर्ण योगदान देतील, या प्राथमिक उद्देशाने या विद्यापीठाची स्थापना केली आहे. सध्याचे शिक्षण हे केवळ तरुणांना नोकरी मिळविण्यावर भर देणारे आहे. परंतु, पतंजली विद्यापीठात तरुणांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याला प्राधान्य देण्यात येते. प्राचीन वैदिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान, समृद्ध जीवनशैली याची सांगड घालत विज्ञान आणि अध्यात्माचे महत्त्व अधोरेखित करण्यावर विद्यापीठामार्फत भर दिला जातो.’’



# जेजुरीच्या मर्दानी दसरा सोहळ्याची जय्यत तयारी ; मध्यरात्री एक वाजता होणार देवभेट

**जेजुरी । प्रतिनिधी**

श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने दसरा उत्सवानिमित्त पालखी मार्गावर विद्युतरोषणाई, पालखी मार्गाची दुरुस्ती, रमणा डोंगरात देवभेटीवेळी हवाई फटाक्यांची आतषबाजी, जेजुरी गडावर तलवार स्पर्धा घेऊन विजेत्यांना रोख पारितोषिके, कलावंतांना मानधन, खांदेकरी तसेच मानकरी यांचा सन्मान आदी परंपरेनुसार उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अनिल सौंदडे यांनी सांगितले.

या बैठकीवेळी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, पदाधिकारी सुधीर गोडसे, कृष्णा कुदळे, इनामदार राजेंद्र पेशवे, सचिन पेशवे, गणेश आगलावे, छबन कुदळे, रोहिदास माळवदकर, संतोष खोमणे पाटील, रामदास राऊत, दीपक राऊत, राजेंद्र चौधरी, संदीप जगताप, माजी नगरसेवक हेमंत सोनवणे, जाफर पानसरे, देवाचे मानकरी, पालखी सोहळ्याचे खांदेकरी, पुजारी सेवकवर्ग आणि ग्रामस्थ उपस्थित होते. देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अनिल सौंदडे, पांडुरंग थोरवे, मंगेश घोणे, अभिजित देवकाते, पोपट खोमणे, व्यवस्थापक आशिष बाठे आदी उपस्थित होते.

# कुरीअरच्या डिलीव्हरी वरुन उलगडला खुनाचा गुन्हा

पिंपरी – सतत होणार्या भांडणामुळे दोन जणांनी मिळून आपल्याच मित्राचा खून केला. ही घटना औध रुग्णालयाच्या आवारात मंगळवारी उघडकीस आली. पोलिसांनी सीसीटीव्ही फूटेज तपासात खुनाचा उलगडा केला.

पप्पु उर्फ जितेंद्र त्रिपाठी (रा. अहोदा, तहसील राजापुर, जि. चित्रकुट, उत्तर प्रदेश) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. शिव मंगल सिंग (वय ३८) आणि सोमदत्त मनमोहन दुबे (वय २२, दोघेही रा. अहोदा, तहसील राजापुर, जि. चित्रकुट, उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी पहाटे औंध रुग्णालय परिसरात एकाचा दगडाचा ठेचून खून झाल्याचे उघडकीस आले. मयत व्यक्तीची ओळख पटली नाही.



गुंडा विरोधी पथकाचे प्रमुख सहायक निरीक्षक हरीश माने यांच्या पथकाने आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरूवात केली. त्यावेळी दोनजण इसम मयत व्यक्तीसोबत दुचाकीवरुन ट्रिपल सीट बसून सांगवी परिसरात दारु घेण्यासाठी आलेले आढळुन आले. त्यातील एकाच्या हातामध्ये पांढऱ्या रंगाची पार्सलची पिशवी होती. संशयित दुचाकीवरुन कोठे जात आहे हे सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता तो कृष्णा चौकातील कुरियरच्या कंपनीमध्ये गेल्याचे निष्पन्न झाले. कुरिअर कंपनीमध्ये जावून चौकशी केली असता संशयिताचे नाव शिव मंगल सिंग असल्याचे समजले. पोलिसांनी त्याचा मोबाइल क्रमांक मिळवून त्याचे तांत्रिक विश्लेषण केले असता त्या फोनचे लोकेशन पारनेर येथे असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांचे एक पथक आरोपीच्या मागावर रवाना केले. अर्धा तास एकाच लोकेशन आल्याने आरोपी जेवणाकरिता थांबले असल्याचा संशय आला. पोलिसांनी त्या भागातील एका हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आरोपी हे जेवण करण्यासाठी एक तासापूर्वी थांबल्याचे निष्पन्न झाले. त्या फुटेजवरून लागलीस सी.सी.टी.व्ही. मार्फत आरोपी प्रवास करीत असलेल्या ट्रॅव्हल बस क्रमांक प्राप्त केला. आरोपींना समृध्दी महामार्गावरील वाशिम जिल्ह्यातील शेल टोल प्लाझा येथून ताब्यात घेतले तांत्रिक विश्लेषण करून ट्राव्हलर्स बसच्या चालकाच्या मोबाइलवर पोलिसांनी संपर्क केला. तुमच्या बसमध्ये आरोपी असून पोलीस पाठलाग करीत असल्याचे सांगितले. त्यासाठी बसचा वेग कमी ठेवण्याच्या सूचना पोलिसांनी दिल्या. त्यानुसार बस चालकाने बसचा वेग कमी ठेवल्याने पोलिसांनी वाशिम येथे आरोपी प्रवास करीत असलेल्या बसला गाठले व आरोपींना ताब्यात घेतले. ही कामगिरी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपाआयुक्त संदीप डोईफोडे, सहायक आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हरीश माने उपनिरीक्षक अशोक जगताप, अंमलदार पी.पी.तापकीर, एस.एन.ठोकळ, व्ही.एच.जगदाळे, जी.डी.चव्हाण, एस.डी.चौधरी, ए.पी.गायकवाड, व्ही.टी.गंभीरे, जी.एस.मेदगे (तात्रिक विश्लेषण), के. पी. वाळंजकर (रेखाचित्रकार), एस.पी.बाबा (तात्रिक विश्लेषण), एन.बी.गेंगजे, व्ही.डी.तेलेवार, आर.के.मोहीते, एस.पी.घारे, एस.टी.कदम, टी.ई.शेख, व्ही.एन.वेळापुरे यांच्या पथकाने केली आहे.

## अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या हवेली तालुका अध्यक्षपदी बापूसाहेब कंद यांची निवड

**वाघोली । प्रतिनिधी**

अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश बोधले महाराज यांच्या अध्यक्षतेखाली बापूसाहेब ज्ञा.कंद यांची हवेली तालुका अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

बापूसाहेब कंद यांना अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. हवेली तालुक्यात एक उत्तम उद्योजक आणि अध्यात्माचे संस्कार जनमानसात रुजवणारा एक वारकरी म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती आहे. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद, खाण क्रशर संघटनेचे सर्व पदाधिकारी, पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रामभाऊ दाभाडे, कमल बाग सोसायटीचे चेअरमन तथा उद्योजक संतोष देशमुख आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या माध्यमातून तालुक्यात अध्यात्माचे संस्कार रुजवण्यासाठी यापुढील काळात विविध सामाजिक बांधिलकीचे उपक्रम राबवणार असल्याचे बापूसाहेब कंद यांनी सांगितले.

# ओतूर परिसरात मुसळधार पाऊस रस्त्यांना आले ओढ्याचे स्वरूप

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर आणि परिसरात बुधवारी दुपारी १ वाजेपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली असून मोठ्या प्रमाणात पाण्याचे लोंढे रस्त्यांवरून वहात असल्यामुळे रस्त्यांना ओढ्याच्या पुराचे स्वरूप आले होते. या परतीच्या पावसाने ओतूर आणि परिसराला अक्षरशः झोडपून काढले. या पावसामुळे काढणीला आलेल्या सोयाबीन पिकाला मोठा धोका तयार होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

गेली महिनाभर पावसाने विश्रांती घेतली होती.मोठ्या प्रतीक्षेनंतर पावसाने लावलेल्या हजेरीमुळे जोरदार झालेल्या पावसाने सर्वत्र पाणीच पाणी करून टाकले. त्याशिवाय



ओतूर गावठाणातील सर्व रस्ते जलमय होऊन वहात होते. परिणामी व्यापारी बाजार पेठेतील सर्व व्यवहार ठप्प झाल्याचे निदर्शनास आले.

ओतूर,रोहकडी, आंबेगव्हान, फापाळे शिवार, डोमेवाडी,पानसरे वाडी,धोलवड, ठीकेकरवाडी, उदापूर, खामुंडी,मांदारणे, डींगोरे आदी परिसरात देखील मुसळधार पाऊस बरसल्याचे वृत्त हाती आले आहे.परतीचा पाऊस नुकसानिकारक ठरत असल्याचे बोलले जात आहे.

# ३२ वर्षीय महिलेला जबरदस्ती घरातून नेलं

## दोन दिवस डांबून ठेवलं अन् गळ्यातील मंगळसूत्र तोडून केला अत्याचाराचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात गेल्या काही दिवसांपुर्वी बोपदेव घाटात २१ वर्षीय तरूणीवर सामूहिक अत्याचार झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणातील आरोपी अद्याप फरार आहेत, पोलिसांची अनेक पथकं आरोपीच्या शोधात आहेत, मात्र अद्याप कोणतीही अटक झालेली नाही, हे प्रकरण ताजं असतानाच पुण्यात पुन्हा एक महिला अत्याचाराची घटना घडली होती. पुण्यातून ३२ वर्षे महिलेचे अपहरण करत तिला जंगलात नेत तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करण्यात आला.




पुण्यातील महिलेवर कर्जतच्या जंगलात अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची ही संतापजनक घटना उघडकीस आली. बत्तीस वर्षे महिलेचे अपहरण करून कर्जतच्या जंगलात नेऊन अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आला आहे. याप्रकरणी ३६ वर्षीय पुरुष आरोपी आणि ३२ वर्षीय महिला आरोपी विरोधात सहकारनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३२ वर्षीय महिला ही पुण्यातील सहकार नगर परिसरात पाहते. या महिलेला तिच्या ओळखीच्या ३६ वर्षीय आरोपीने गाडीत बसवत कर्जतच्या जंगलात नेत तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. आरोपीने हाताने पिडीत महिलेला मारहाण करत दोन दिवस घरात डांबून ठेवत कर्जत येथील जंगलात नेत तिच्यावर जबरदस्ती करत तिच्या गळयातील मंगळसूत्र तोडून तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न केला.या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

# सांगवी बोपोडी पुलाचे उपमुख्यमंत्री ’अजित पवार’ यांच्या हस्ते उद्घाटन

पुणे शहराला जोडणारा मध्यवर्ती भागातील मुळा नदीवरिल सांगवी बोपोडी पुलाचे बुधवार ता.९ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन करून लोकार्पण करण्यात आले. आधी पुलाचे काम संथगतीने झाले.त्यात गेली काही महिन्यांपासून पुलाचे काम होवूनही उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पुलाचे उद्घाटन करून विधानसभा निवडणूक आचारसंहितेपूर्वी उद्घाटन करून लोकार्पण करण्यात यावे अशी नागरिकांमधून मागणी होती.

पुणे व पिंपरी चिंचवड शहराला जोडणारा दुवा झाल्याने ईतर रस्त्यावरील ताण कमी होवून रहदारी सुकर होण्यासोबतच नागरिकांचा दोन्ही शहरांत ये जा करण्यासाठी वेळ व इंधन बचत होणार असल्याने नागरिकांमधून हा पुल लवकर खुला करण्याची नागरिकांची मागणी व उत्सुकता होती. यावेळी आमदार अश्विनी जगताप, आमदार सिद्धार्थ शिरोळे, पुणे महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह,जिल्हाधिकारी सुहास दिवसे,भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप,माजी महापौर उषा ढोरे, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, माजी नगरसेवक प्रशांत



शितोळे,अतुल शितोळे , संतोष कांबळे, हर्षल ढोरे, शारदा सोनवणे,आनंद छाजेड,अखिल सांगवी ज्येष्ठ नागरिक संघ, पिंपरी चिंचवड अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार बोराटे, चंद्रकांत इंदलकर, कार्यकारी अभियंता प्रमोद ओंभासे यांच्यासह सांगवीकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगवीच्या वैभवात भर – पुणे व पिंपरी चिंचवड शहराचे प्रवेशद्वार अशी जुनी सांगवीची ओळख आहे. सांगवी फाटा येथील महात्मा ज्योतिबा फुले उड्डाणपूलानंतर मुळा नदी परिसरातील गर्द झाडी पलिकडे पुणे विद्यापीठाच्या वनराईने नटलेल्या या भागात पुल झाल्याने जुनी सांगवीच्या वैभवात भर पडली आहे.पुणे व पिंपरी चिंचवड शहर या पुलामुळे जोडले गेल्याने सांगवीचा मुळा नदी किनारा परिसर गजबजणार आहे.

ज्येष्ठांनी केले होते प्रतिकात्मक उद्घाटन – निसर्ग रम्य परिसर व पुलाचे काम होवूनही पुल खुला होण्यास होणारी दिरंगाई यामुळे येथील ज्येष्ठांनी काही दिवसांपूर्वीच या पुलाचे लवकर उद्घाटन करून लोकार्पण करावे अशी मागणी करत या पुलाचे प्रतिकात्मक उद्घाटन करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. अखेर पुलाचे उद्घाटन झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार पुलाच्या उद्घाटनासाठी येणार असे कळताच सांगवी करांनी सकाळपासूनच पुल परिसरात मोठी गर्दी केली होती.

# चालू वीजबिलासह शंभर टक्के थकबाकी वसूल करा; महावितरणचे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांचे निर्देश

**बारामती । प्रतिनिधी**

वीजग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासह दरमहाच्या चालू वीजबिलाची व मागील थकबाकी वसुली करावी. त्यासाठी पुढील सहा महिन्यांचा कृती आराखडा बनवून आणि त्यात सातत्य राखून वीजबिल वसुली करावी तसेच ग्राहक सेवेत सुधारणा करण्याचे निर्देश महावितरण पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी दिले. बुधवारी (दि. ९) बारामती येथील ऊर्जाभवन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी बोलताना खंदारे म्हणाले, चालू आर्थिक वर्षात बारामती परिमंडलाची लघुदाब वर्गवारीतील घरगुती,



वाणिज्यिक, औद्योगिक व इतर ग्राहकांची मार्च अखेर ४४ कोटी रुपये असलेली थकबाकीची रक्कम १४४ कोटींवर गेली आहे. ही रक्कम वसूल करण्यासाठी पुढील सहा महिन्यांचा कृती आराखडा तयार करुन त्यावर काम करावे लागेल. शिवाय चालू बिले शंभर टक्के अधिक थकबाकी वसूल करणे हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे. या उद्दिष्टपूर्तीसाठी जनमित्रांपासून वरिष्ठ अभियंत्यापर्यंत प्रत्येकाचे योगदान महत्वाचे आहे. आपल्या कामांचा आलेख हा नेहमी चढताच असला पाहिजे. प्रधानमंत्री सूर्यघर योजना, मागेल त्याला सौर कृषीपंप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आदी अनेक लोकाभिमुख योजना महावितरणच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत. ‘मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०’ मुळे शेतीला दिवसा वीज देणे शक्य होणार आहे. त्याकरिता ह्या योजनांच्या कामांना गती द्या. तसेच मा. वीज नियामक आयोगाने घालून दिलेल्या कृती मानकांनुसार वीज कनेक्शन वेळेत देण्याचे व तक्रार निवारण करण्याच्या सूचनाही प्रादेशिक संचालकांनी यावेळी केल्या.

बैठकीला मुख्य अभियंता अंकुश नाळे यांचे प्रमुख उपस्थितीसह अधीक्षक अभियंते दीपक लहामगे (बारामती), बाळासाहेब हळनोर (सातारा), सुनील माने (सोलापूर), सहा. महाव्यवस्थापक (वि.व ले.) सौ. कीर्ती भोसले, सहा. महाव्यस्थापक (मासं) धैर्यशील गायकवाड व सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते उपस्थित होते.